# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०२३

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

## प्रश्नांची एकूण संख्या - ५०

---

### सेनगांव येथे नवीन औद्योगिक क्षेत्राची (एमआयडीसी) निर्मिती करण्याबाबत

**(१) ३५२०४ (१२-०१-२०२२). श्री.चंद्रकांत ऊर्फ राजुभैय्या रमाकांत नवघरे (बसमत), श्री.इंद्रनिल नाईक (पुसद), श्री.यशवंत माने (मोहोळ) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विदर्भ व मराठवाडयातील डोंगराळ भागात वसलेल्या सेनगांव तालुक्याची (जि. हिंगोली) निर्मिती दिनांक १५ ऑगस्ट, १९९२ रोजी झाली असून या तालुक्यास १३३ गांवे जोडलेली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सेनगांव निर्मितीस ३० वर्षे उलटूनही सदर तालुका शिक्षण व उद्योग धंद्यापासून वंचित असून तेथील तरुणांवर बेरोजगारीमुळे उपासमारीची वेळ आली आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तेथिल तरुणांना रोजगाराचे साधन उपलब्ध व्हावे म्हणून सेनगांव तालुक्यात नवीन औद्योगिक क्षेत्र (एमआयडीसी) व लघुकेंद्राची निर्मिती व्हावी, अशी मागणी स्थानिक जनतेकडून तसेच लोकप्रतिनिधींकडून शासनाकडे करण्यांत आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सर्वसामान्य जनतेची मागणी लक्षात घेऊन तरुणांना रोजगार मिळण्यासाठी तसेच नोकरीनिमित्त अन्य जिल्ह्यात नागरिकांचे होणारे स्थलांतर रोखण्यासाठी सेनगांव तालुक्यात औद्योगिक क्षेत्राची (एमआयडीसी) निर्मिती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यांत येत आहे

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. उदय सामंत (१५-०३-२०२३) :** (१),(२),(३),(४) सेनगांव येथे औद्योगिक क्षेत्र स्थापन करण्यासाठी मा. लोकप्रतिनिधीच्या मागणीनुसार दि. १०/०२/२०१५, १५/०६/२०१७ व २७/०२/२०१९ रोजी मऔवि महामंडळाचे अधिकारी व स्थानिक पदाधिकाऱ्यांसमवेत मौजे सेनगांव, शिदेफळ, सिवणी खु., सिनगी नागा आणि सुकळी बु. या गावातील साधारणत: २०० ते २५० हेक्टर सरकारी जमिनीची पाहणी केली. सदर जमिन ही डोंगराळ स्वरुपाची असल्याने त्याठिकाणी भूखंडाचे आरेखन करुन वाटप करणे नियोजनदृष्ट्या शक्य नाही. त्यामुळे सदर ठिकाणी मऔवि महामंडळाचे औद्योगिक क्षेत्र स्थापन करणे संयुक्तिक होणार नाही.

मऔवि महामंडळाने हिंगोली शहरापासून जवळपास २ ते ३ कि.मी. अंतरावर मौजे लिंबाळा (मक्ता) येथे एकूण २०४.९० हे.आर क्षेत्र संपादित केलेले असून त्याठिकाणी मोठे औद्योगिक क्षेत्र स्थापन केलेले आहे. सदरील औद्योगिक क्षेत्र हे मऔवि महामंडळाव्दारे पूर्णपणे विकसीत करण्यात आलेले असून सदरहू औद्योगिक क्षेत्रातील उद्योग घटकांमध्ये स्थानिक व लगतच्या परिसरातील तरुणांना रोजगाराची संधी मोठ्या प्रमाणात उपलब्ध होवू शकेल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राज्यातील अंशत: अनुदानित शाळांमधील शिक्षकांच्या वेतनाबाबत

**(२) ३९५७७ (०१-०४-२०२२). श्री.सचिन कल्याणशेट्टी (अक्कलकोट), श्री.सिध्दार्थ शिरोळे (शिवाजीनगर), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा), श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अंशत: अनुदानित शाळांमधील ३३६१ शिक्षकांना माहे डिसेंबर, २०२१ चे वेतन अद्याप मिळाले

नसल्याने त्यांच्यावर उपासमारीची वेळ आल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू शिक्षकांनी शिक्षक आमदारांसह मंत्रालयात येऊन वेतन न काढल्यास राज्यभर तीव्र आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अंशत: अनुदानित शाळांतील शिक्षकांचे वेतन काढण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर (२०-०३-२०२३) :** (१), (२) हे अंशत: खरे आहे.
(३) सन २०२०-२१ पासून संपूर्ण देशभरात कोरोना विषाणूमुळे उद्भवलेल्या महामारीच्या परिस्थितीमुळे राज्यात आर्थिक टंचाई निर्माण झाल्यामुळे प्रत्येक महिन्यांकरिता वेतन व इतर बाबींसाठी आवश्यक असणारा निधी मर्यादित मासिक स्वरुपात तात्पुरती व्यवस्था म्हणून खर्चासाठी उपलब्ध करुन देण्यात येत होता. वित्त विभागाकडून पुरवणी मागणीद्वारे वेतन अनुदान उपलब्ध झाल्यानंतर अंशत: अनुदानित शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे वेतन अदा करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कल्याण (पूर्व) (जि.ठाणे) येथे शिधावाटप कार्यालयासाठी जागा उपलब्ध करून देणे बाबत

**(३) ४२३३९ (०९-०४-२०२२). श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कल्याण (पूर्व) (जि.ठाणे) येथे शिधावाटप कार्यालय मंजूर असून जागे अभावी सुरु करण्यात आले नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शिधावाटप कार्यालयाकरिता जागा उपलब्ध करून देणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी वारंवार विनंती करून सुद्धा अद्याप पर्यंत त्यावर कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबनाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (०४-०५-२०२३) :**(१) हे खरे नाही.
(२) व (३)
कल्याण (पश्चिम) येथे शिधावाटप कार्यालय कार्यरत असून कल्याण (पूर्व) येथे शिधावाटप कार्यालय अद्याप मंजूर झालेले नाही. त्यामुळे ते जागा उपलब्ध नसल्याने कार्यान्वित करण्याचा प्रश्न उद्भवत नाही,
या विभागाच्या दिनांक १८/४/२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये विभागाचा सुधारित आकृतीबंध मंजूर झाला असून सदर आकृतीबंधाच्या अनुषंगाने विभागाच्या दिनांक २५/८/२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये नियंत्रक, शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई कार्यालयातील पदसंख्या निश्चित करण्यात आली आहे.
नियंत्रक, शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई कार्यालयातील सुधारित संवर्गनिहाय पदसंख्या, दरम्यानच्या कालावधीत वाढ झालेली लोकसंख्या व शिधापत्रिकांची वाढीव संख्या विचारात घेऊन मुंबई/ठाणे शिधावाटप क्षेत्रातील शिधावाटप कार्यालयाच्या विधानसभा मतदारसंघनिहाय पुनर्रचनेबाबतचा सुधारित प्रस्ताव दिनांक २८ फेब्रुवारी, २०२३ रोजीच्या पत्रान्वये नियंत्रक शिधावाटप, मुंबई यांच्याकडून मागविण्यात आला आहे
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**हायब्रिड ॲन्युटी अंतर्गत' कळंब-ढोकी-तेर या राज्यमार्गाची दुरवस्था झाल्याबाबत**

**(४) ४२४४३ (१८-०४-२०२२). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (तुळजापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कळंब-ढोकी-तेर या राज्यमार्गाची दुरवस्था झाल्यामुळे 'हायब्रिड ॲन्युटी अंतर्गत' सदर कामास दिनांक २१ जून २०१९ रोजी सुरुवात करण्यात आली असून सद्य:स्थितीत येथील रस्त्याचे काम दिनांक ३ फेब्रुवारी २०२२ पर्यंत सुरु असून ते अपूर्णावस्थेत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर राज्यमार्गाच्या कामा दरम्यान मौजे भाटशिरपूरा या गावालगत पुलाचे काम करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर रस्त्याचे व पुलाचे काम बऱ्याच महिन्यांपासून संथ गतीने होत असल्यामुळे प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, रस्त्याच्या कामातील दिरंगाई मुळे वाहतुकी योग्य नसलेला हा रस्ता पावसाळ्यात व वेळोवेळी सतत बंद ठेवावा लागत असल्याने प्रवाश्यांना नाहक त्रास सहन करावा लागला आहे, तसेच अपूर्ण कामामुळे येथे बरेच अपघात घडत असून जीवित व वित्त हानी झाली आहे, हे ही खरे आहे काय आहेत?

(५) असल्यास, रस्त्याच्या व पुलाच्या अपूर्ण कामामुळे शेतकऱ्यांचे सतत नुकसान झालेल्या जीवित व वित्त हानीची नुकसान भरपाई देण्याबाबत व वेळेत काम पूर्ण न झाल्याची जबाबदारी निश्चित करून संबंधितांवर कारवाई करण्याच्या अनुषंगाने शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय?

**श्री. रविंद्र चव्हाण (२०-०४-२०२३) :** (१) प्रश्नांकीत रस्त्याच्या मंजूर ५७.५० किमी लांबीपैकी ०.३ कि.मी लांबी वगळता उर्वरित लांबीतील काम पूर्ण करण्यात आले आहे..

(२) व (३) मौजे भाटशिरपूरा या गावालगत पुलाचे काम पूर्ण झालेले असून, सदर पुलाच्या पोचमार्गाचे २०० मी. लांबीत डांबरीकरणाचे काम शेतक-यांच्या विरोधामुळे प्रलंबित आहे.

सद्यस्थितीत पुलावरुन वाहतुक सुरळीत सुरु आहे.

(४) सन २०२२ मध्ये पुलाचे काम चालू असताना अतिवृष्टीमुळे पर्यायी रस्त्यावरुन पाणी जात असल्याने, काही काळ वाहतुक थांबवावी लागली होती. सद्यस्थितीत पुलाचे काम पुर्ण झाले असुन पुलावरुन वाहतुक सुरळीत सुरु आहे.

सदर रस्त्यावर वाहन चालकाने भरधाव वेगाने, निष्काळजीपणे, हयगयीने वाहन चालविल्याने, तसेच पाठीमागून धडक दिल्याने अपघात झाल्याची नोंद संबंधीत पोलीस ठाणे येथील FIR मध्ये आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बुलढाणा जिल्ह्यातील हमाल माथाडी कामगार व संस्था हक्कापासून वंचित असल्याबाबत**

**(५) ४४५४९ (११-१०-२०२२). ॲड.आकाश फुंडकर (खामगांव) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्ह्यातील हमाल माथाडी संस्था असून या संस्थेचे कार्यक्षेत्र नाशिक जिल्ह्यापुरते मर्यादित असताना बुलढाणा जिल्ह्यातील शासकीय धान्य गोदामातील हमाल कामगार कामांचे कंत्राट सद्य:स्थितीत १) साई मल्हार हमाल माथाडी कामगार को-सोसायटी लिमिटेड, नाशिक (या संस्थेने बुलढाणा जिल्ह्यातील ८ शासकीय गोडाऊन), २) सप्तशृंगी हमाल व माथाडी कामगार को सोसायटी लिमिटेड, नाशिक, ३) जय मल्हार हमाल व माथाडी कामगार को-सोसायटी लिमिटेड, नाशिक (उर्वरित बुलढाणा जिल्ह्यातील ८ शासकीय गोडाऊन वरील हमाल कामगारांचे काम) या संस्थांना देण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य शासनाने दिनांक २१/१२/२००४ रोजी निर्गमित केलेल्या शासन परिपत्रकातील मुद्दा क्रमांक आठ अन्वये तसेच महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या कलम १८(क) नुसार संघीय संस्थांची अधिकारिता हे जिल्हा पुरतेच ठेवावे अशी स्पष्ट तरतूद आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर तिन्ही संस्थांचे वाढीव कार्य क्षेत्रामुळे बुलढाणा जिल्ह्यातील हमाल माथाडी कामगार व संस्था हक्कापासून वंचित झाले असून त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास,बुलढाणा जिल्ह्यातील माथाडी संस्थांमधील कामगारांचा अन्याय दूर करण्यासाठी नाशिक जिल्ह्यातील सध्या कार्यरत असलेल्या तिन्ही संस्थांचे कंत्राट तात्काळ रद्द करून स्थानिक संस्थांना काम देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (१३-०४-२०२३) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
सदर शासन परिपत्रक दि.२१.०४.२००४ हे सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाकडून निर्गमित करण्यात आले आहे.
(३) हे खरे नाही.
शासन निर्णय दिनांक ०८ मे, २०१८ नुसार बुलढाणा जिल्हयातील कामगार संस्थेकडे माथाडी मंडळाचे ना-देय प्रमाणपत्र नसल्याने त्यांना कंत्राट मिळू शकले नाही. त्यामुळे सदर संस्था हक्कापासून वंचित असल्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(४) शासकीय गोदामातील अन्नधान्याच्या हाताळणूकीसाठी दि.०६.०३.२०२३ रोजी नवीन हमाल कंत्राट धोरण निश्चित करण्यात आले असून सदर धोरणानुसार राज्यातील सर्व जिल्हयामध्ये नवीन हमाल कंत्राट निश्चित करण्याबाबत कार्यवाही करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पंचनदी (ता.दापोली, जि.रत्नागिरी) येथील जोडरस्त्याचे काम करण्याबाबत**

**(६) ४५४२६ (२०-०९-२०२२). श्री.योगेशदादा कदम (दापोली) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दापोली (जि.रत्नागिरी) तालुक्यात नाबार्ड अंतर्गत बांधण्यात आलेल्या पंचनदी येथील पुलाचे काम पूर्ण झाले असून जोडरस्त्याचे काम अदयापही अपूर्ण अवस्थेत असल्याचे माहे मे, २०२२ मध्ये निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पुलाचे जोडरस्त्याच्या कामास जमीन धारकाने हरकत घेतली असून, या जागेतील खारफुटीची झाडे यामुळे काम अपुर्ण राहण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, सदर प्रकरणी ग्रामीण मार्ग १८ वरील पुलाच्या जोडरस्त्याकरीता आवश्यक जागेचे भुसंपादन पूर्ण करुन आवश्यक परवानगी प्राप्त करुन, मंजुरी, निधी व निकषानुसार जोडरस्त्यांचे काम पुर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (२८-०२-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) जोडरस्ता जया जागेतुन जात आहे त्या जागेचे मालक श्री.महेश श्रीकृष्ण महाजन यांना हरकत घेतलेने भूसंपादनाची आवश्यकता आहे. तसेच या जागेमध्ये काही प्रमाणात खारफुटीची झाडे देखील आहेत.
(३) प्रस्तुत मार्ग हा ग्रामीण मार्ग असून तो जिल्हा परिषदेच्या अखात्यारीत असल्यामुळे यासंदर्भात अधीक्षक अभियंता, सा.बां.मंडळ, रत्नागिरी यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, रत्नागिरी यांना सदर जोडरस्त्याचे काम जिल्हा वार्षिक योजना अथवा अन्य योजनांमधुन जिल्हा परिषदेमार्फत करून घेण्यास विनंती केली आहे.
(४) प्रश्न उभ्दवत नाही.

---

## कान्हे व मळवली (ता.मावळ, जि.पुणे) येथील वहातुककोंडी टाळण्यासाठी रेल्वेमार्गावर उड्डाणपूल बांधण्याबाबत

**(७) ४७६७५ (२८-०९-२०२२). श्री.सुनिल शेळके (मावळ) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कान्हे व मळवली (ता.मावळ, जि.पुणे) या दोन्ही रेल्वे क्रॉसिंगच्या रस्त्यावरील वाहतूक कोंडी टाळण्यासाठी तेथील रेल्वेमार्गावर उड्डाणपूल बांधण्याच्या प्रस्तावास मंजुरी देण्यात आली असून या कामासाठी केंद्र शासन ५० % व राज्य शासन ५० % निधीची तरतूद करणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कामाकरिता दिनांक ३१ मार्च, २०२२ रोजी वा त्यासुमारास कान्हे उड्डाणपुलासाठी सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत ३ कोटी १५ लाख रुपयांचा पहिला हिस्सा देखील उपलब्ध करून दिला आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर काम बऱ्याच दिवसांपासून प्रलंबित असल्याने कान्हे येथील रेल्वे क्रॉसिंग ठिकाणी सातत्याने वाहतूक कोंडी होत आहे, यामुळे आंदर मावळातील टाकवे एमआयडीसीतील अनेक नामवंत कंपन्या स्थलांतरित होत असल्याने येथील स्थानिक भूमिपुत्रांचा रोजगार धोक्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू कंपन्या स्थलांतरित झाल्यास कामगारांवर उपासमारीची वेळ येऊन त्याचप्रमाणे कंपन्यांचे सुद्धा नुकसान होणार असल्याने सदर प्रकरणी वारंवार पाठपुरावा करूनही बऱ्याच वर्षांपासून प्रलंबित असणाऱ्या या कामाला गती मिळालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन वाहतूक कोंडी टाळण्यासाठी रेल्वेमार्गावर उड्डाणपूल बांधण्याच्या प्रस्तावाबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (२०-०४-२०२३) :** (१) होय हे खरे आहे,

(२) होय हे खरे आहे,

(३) व (४) कान्हे व मळवली या दोन्ही रेल्वे उड्डाणपूलाचे बांधकाम रेल्वे विभागाकडून करण्यात येणार आहे.

या कामाकरीता लागणारे भूसंपादन व सेवा वाहिन्यांचे स्थलांतरण या बाबी सा.बां.विभागाकडून करण्यात येणार आहेत. सा.बां.विभागाकडून यासाठी भूसंपादन प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे यांचेकडे सादर केलेला आहे. या दोन्ही कामाच्या पुलाचा सर्वसाधारण आखणी नकाशा सार्वजनिक बांधकाम विभागाकडून मंजूर करून रेल्वे विभागास सादर करण्यात आलेला आहे. उड्डाणपूल व जोडरस्ते -रेल्वे आणि भूसंपादन व सेवावाहिन्या स्थलांतरण सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत करण्यात येणार आहे. तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाने सुधारित GAD मंजूर करण्यात आली असून रेल्वे विभागाकडे सुधारित GAD मंजूरीसाठी सादर करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नाशिक-येवला रस्त्याच्या कामाला आशियाई विकास बँक अर्थसहाय्य अंतर्गत मान्यता देण्याबाबत

**(८) ४९९११ (१८-०१-२०२३). श्री.छगन भुजबळ (येवला), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्ह्यातील नाशिक-येवला प्रमुख राज्य मार्ग क्र.२ या चौपदरी रस्त्याची दुरवस्था झाल्यामुळे या रस्त्याच्या कामाला आशियाई विकास बँक अर्थसहाय्य अंतर्गत प्रशासकीय मान्यता देण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी दिनांक २९ सप्टेंबर, २०२२ व १८ ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रश्न भाग (१) बाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास विलंबनाची कारणे काय ?

**श्री. रविंद्र चव्हाण (२०-०३-२०२३) :** (१) होय , हे खरे आहे.

(२) आशियाई विकास बँकेचे निकष, निधी उपलब्धता व प्राथम्यक्रमानुसार काम हाती घेण्याचे नियोजन राहील.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### ठाणे येथील सार्वजनिक बांधकाम विभाग आणि तहसील कार्यालयाचा पुनर्विकास करण्याबाबत

**(९) ४९९३९ (१८-०१-२०२३). डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.अनिल पाटील (अमळनेर), श्री.यशवंत माने (मोहोळ) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे येथील सार्वजनिक बांधकाम विभाग आणि तहसील कार्यालयाच्या पुनर्विकासासंदर्भात मा.मुख्यमंत्री यांचे अध्यक्षतेखाली दिनांक २८ जुलै, २०२२ रोजी वा त्यासुमारास सह्याद्री अतिथीगृह,मुंबई येथे बैठक घेण्यात आली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त बैठकीमध्ये घेतलेल्या निर्णयाचे थोडक्यात स्वरुप काय आहे,
(३) असल्यास, सार्वजनिक बांधकाम आणि तहसील कार्यालय पुनर्विकास प्रकल्प मार्गी लावण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (०६-०३-२०२३) :** (१) हे खरे आहे.
(२) दि.२८ जुलै, २०२२ रोजीच्या मा.मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखालील बैठकीत ठाणे महानगरपालिकेने सर्व विभागांच्या सूचना विचारात घेऊन, सदर प्रकल्पाचा पीपीपी तत्वावर विकास करण्याबाबतचा विस्तृत अहवाल (डीपीआर) शासनास सादर करण्याबाबत निर्णय झाला.
(३) व (४) दि.१३ सप्टेंबर, २०२२ रोजीच्या मा.मुख्य सचिव यांच्या बैठकीमध्ये सदर पुनर्विकास प्रकल्प पीपीपी तत्वाऐवजी सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत कार्यान्वीत करण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत. त्यास अनुसरुन पुढील कार्यवाही करण्याचे नियोजन आहे.

---

### वाडा (जि.पालघर) तालुक्यात रस्त्यांच्या कामात झालेला गैरव्यवहार

**(१०) ४९९४० (१८-०१-२०२३). डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.यशवंत माने (मोहोळ) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाडा (जि.पालघर) तालुक्यातील रस्त्यांची कामे न करताच कोट्यवधी रुपयांची बोगस बिले काढून केलेल्या गैरव्यवहाराची सखोल चौकशी करुन कारवाई करण्याबाबत लोकप्रतिनिधी व सामाजिक संघटनांनी मा.मुख्यमंत्री व मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री यांचेकडे दिनांक ०३ ऑगस्ट, २०२२ रोजी तसेच वारंवार निवेदनाद्वारे तक्रार केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत, तसेच रस्त्यांची कामे न करताच बोगस बिले काढून आर्थिक गैरव्यवहार करणा-यांवर कडक कारवाई करण्यासंदर्भात आतापर्यंत कोणता पाठपुरावा केला वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलेबांची कारणे काय आहेत?

**श्री. रविंद्र चव्हाण (०८-०५-२०२३) :**(१) व (२) वाडा तालुक्यातील रस्त्यांच्या कामातील अनियमिततेबाबत सामाजिक संघटनांकडून प्राप्त तक्रारींची चौकशी करण्यासाठी अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, रायगड यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली होती. सदर समितीच्या अहवालानुसार ९ कामे प्रत्यक्षात न करता काल्पनिक मोजमापे नोंदवून कंत्राटदारास देयके अदा केल्याचे आढळून आले आहे. तसेच ९ कामे करारनाम्याप्रमाणे पूर्ण न करता सर्व बाबी पूर्ण केल्याचे मोजमापपुस्तकामध्ये नोंदवून कंत्राटदारास काम न केलेल्या बाबींचेसुध्दा देयक अदा केल्याचे आढळुन आले आहे. त्यानुषंगाने, अनियमिततेस जबाबदार ५ अधिकाऱ्यांविरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ च्या नियम ८ व १२ नुसार शिस्तभंगविषयक कार्यवाही प्रस्तावित आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात जिवनावश्यक वस्तुंच्या किंमतीत भाव वाढ होत असल्याबाबत

**(११) ५००९१ (१८-०१-२०२३). श्री.हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात जीवनावश्यक वस्तुंच्या किंमतीत माहे ऑगस्ट, २०२२ पासून सातत्याने भाव वाढ होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर भाववाढ कमी करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही/उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (१५-०५-२०२३) :** (१) अंश:त खरे आहे. "जीवनावश्यक वस्तू" ही व्यापक संज्ञा असून सर्वसामान्य जनतेसाठी दैनंदिन जीवनात लागणाऱ्या गहू, तांदूळ, साखर, खाद्यतेल, डाळी अशा वस्तुंचा त्यात प्रामुख्याने समावेश होतो. जीवनावश्यक वस्तुंच्या किंमतीवर प्रभाव टाकणारे बहुतांशी घटक जसे पर्जन्यमान, पीक परिस्थिती, देशांतर्गत व आंतरराष्ट्रीय उत्पादन, केंद्र शासनाची व्यापार विषयक धोरणे, वाहतूक खर्च इ. बाबी निसर्गावर अवलंबून आहेत व त्याबाबत घेण्यात येणारे निर्णय केंद्र शासनाच्या अखत्यारितील आहेत. त्यामुळे जीवनावश्यक वस्तूंच्या भावावर नियंत्रण ठेवण्याकरीता करावयाच्या उपाययोजनांवर राज्य शासनास मर्यादा आहेत.
(२) दि.१ फेब्रुवारी, २०१४ पासून राज्यात राष्ट्रीय अन्नसुरक्षा कायद्याची अंमलबजावणी सुरु झालेली आहे. त्यानुसार सद्यस्थितीत अंत्योदय योजनेचे १,०१,१०,२९५ व प्राधान्य कुटुंब योजनेचे ५,५१,४४,०६३ लाभार्थी असून अंत्योदय योजनेच्या लाभार्थ्यास प्रति शिधापत्रिका ३५ किलो व प्राधान्य गटाच्या लाभार्थ्यास प्रतिमाह प्रतिव्यक्ती ५ किलो अन्नधान्याचे वाटप करण्यात येत आहे.

कोरोना विषाणू प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर केंद्र शासनाने प्रधानमंत्री गरिब कल्याण अन्न योजनेंतर्गत राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेअंतर्गत प्राप्त इष्टांकाच्या मर्यादेत अनुज्ञेय असलेल्या अन्नधान्याव्यतिरिक्त प्रतिमाह प्रति सदस्य ५ किलो अन्नधान्य (गहू व तांदुळ) मोफत वितरीत करण्यात आले आहे.

दि. ०४.१०.२०२२ च्या शासन निर्णयानुसार राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत अंत्योदय अन्न योजना, प्राधान्य कुटुंब तसेच औरंगाबाद व अमरावती विभागातील सर्व जिल्हे व नागपूर विभागातील वर्धा अशा १४ शेतकरी आत्महत्याग्रस्त जिल्ह्यांतील एपीएल (केशरी) शेतकरी शिधापत्रिकाधारकांना २०२२ च्या दिवाळीनिमित्त १ किलो रवा, १ किलो चणाडाळ, १ किलो साखर व १ लिटर पामतेल या ४ शिधाजिन्नसांचा समावेश असलेल्या विशेष शिधाजिन्नस संचांचे (आनंदाचा शिधा) ₹ १००/-प्रति संच या दराने वितरण करण्यात आले आहे.

दि. २२.०२.२०२३ च्या शासन निर्णयान्वये उपरोक्त शिधापत्रिकाधारकांना आगामी गुढीपाडवा, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती इत्यादी सणांनिमित्तदेखील "आनंदाचा शिधा" वितरीत करण्याचा निर्णय घेण्यात आला असून त्यानुसार कार्यवाही सुरु आहे. केंद्र शासनाच्या One Nation One Ration Card या योजनेतंर्गत संबंधित रास्तभाव दुकानात आधार Authentication करुन लाभार्थ्याला पोर्टेबिलिटीद्वारे कोणत्याही राज्यातील कोणत्याही रास्तभाव दुकानातून धान्य उचलण्याची सोय उपलब्ध केली आहे.

औरंगाबाद व अमरावती विभागातील सर्व तसेच नागपूर विभागातील वर्धा जिल्ह्यातील एपीएल (केशरी)

शिधापत्रिकाधारक शेतकऱ्यांना शासन निर्णय दि.२८.०२.२०२३ अन्वये अन्नधान्याऐवजी थेट रोख रक्कम हस्तांतरण योजना सुरु करण्यात आली आहे.

अशा प्रकारे सार्वजनिक वितरण व्यवस्थेद्वारे भाववाढीवर नियंत्रण ठेवण्यासाठी कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नवी मुंबईत महाराष्ट्र भवनाची उभारणी करण्यास होत असलेल्या विलंबाबाबत**

**(१२) ५०२९६ (१८-०१-२०२३). श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्रीमती सरोज आहिरे (देवळाली), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.अजित पवार (बारामती), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.धनंजय मुंडे (परळी), कुमारी आदिती तटकरे (श्रीवर्धन), श्री.दिलीपराव बनकर (निफाड), श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम), श्री.अनिल पाटील (अमळनेर), श्री.सुनील राणे (बोरीवली), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाशी, नवी मुंबई येथे शहर व औद्योगिक विकास महामंडळाने (सिडको) सन १९९८ पासून आठ हजार चौरस मीटरचा भूखंड महाराष्ट्र भवनाच्या उभारणीसाठी राखीव ठेवला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नवी मुंबईत अन्य राज्यांची भवन दिमाखात उभारण्यात येऊनही महाराष्ट्र भवनासाठी जागा राखीव ठेवलेली असतांना महाराष्ट्र राज्याचे भवन अद्याप उभारण्यात आले नसल्यामुळे ते उभारण्यात यावे अशी मागणी तेथील मा. लोकप्रतिनिधी व नागरीक वारंवार करीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,महाराष्ट्र भवन उभारणीसाठी तत्कालीन मा. उपमुख्यमंत्री तथा वित्तमंत्री यांनी सन २०२२ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात रुपये १०० कोटी रकमेची आर्थिक तरतूद करण्यात आल्याचे घोषित करुन त्याबाबतचा प्रस्ताव सध्या मा. मुख्यमंत्री यांचेकडे प्रलंबित असल्याचे दि. ६ ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हेही खरे आहे काय,

(४) असल्यास,उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुसार सदर प्रस्तावास मान्यता देऊन महाराष्ट्र भवनाच्या उभारणीसंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. रविंद्र चव्हाण (२१-०३-२०२३) :**(१) सिडको संचालक मंडळाच्या दि.३.३.२०२० रोजीच्या बैठकीत, नवी मुंबई, वाशी येथील सेक्टर ३०-ए मधील शहर व औद्योगीक विकास महामंडळाचया (सिडको) मालकीच्या भूखंड क्र. ११ ते १४, एकूण ८३०.९१ चौ.मी.इतक्या क्षेत्रफळाचा भूखंड महाराष्ट्र भवन तथा विश्रामगृहाच्या बांधकाम व व्यवस्थापनाकरिता सार्वजनिक बांधकाम विभागास वर्ग करण्यात येत असल्याचा निर्णय घेतल्याबाबत सिडकोने दि. ५.३.२०२० रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे.

(२) खरे आहे.

(३) तत्कालीन मा.उप. मुख्यमंत्री तथा वित्तमंत्री यांनी दि.११ मार्च २०२२ रोजीच्या अर्थसंकल्पीय भाषणात नवी मुंबई येथे महाराष्ट्र भवन उभारण्यात येऊन त्यासाठी रु. १०० कोटी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत घोषणा केली आहे.

(४) व (५) सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत सिडको प्राधिकरणाकडे लिझ प्रिमियमपोटी रु. ३१.५० कोटी जमा करण्यात आले आहेत. तसेच सदर भूखंडाचे सविस्त्र सर्वेक्षण करुन मूख्य वास्तुशास्त्रज्ञ यांचयामार्फ रेखांकन आराखडे तयार करण्याचे काम प्रगतीत आहे.

---

### राष्ट्रीय प्रज्ञाशोध परीक्षा योजना कार्यान्वित होणेबाबत

**(१३) ५०२९८ (१८-०१-२०२३). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देशभरातील प्रज्ञावान विद्यार्थ्यांसाठी घेतली जाणारी राष्ट्रीय प्रज्ञाशोध परीक्षा (एनटीएसई) योजना तात्पुरती स्थगित करण्यात आली असून ही योजना पुढे चालू ठेवण्यास केंद्रीय शिक्षण मंत्रालयाने अद्याप नव्याने मंजुरी दिलेली नाही हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या परीक्षेच्या शिष्यवृत्तीच्या रकमेचा विद्यार्थ्यांना पुढील शिक्षणासाठी उपयोग होत असल्याने परीक्षा स्थगित करणे योग्य नाही हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर योजना कार्यान्वित होण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर (२४-०२-२०२३) :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) सदर बाब केंद्रशासनाच्या कार्यकक्षेतील आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### मुंबई येथील अरबी समुद्रातील शिवस्मारक उभारणी प्रकल्पाबाबत

**(१४) ५०४८२ (१८-०१-२०२३). श्री.प्रकाश (दादा) सुंदरराव सोळंके (माजलगांव), श्री.निलेश लंके (पारनेर), श्री.धनंजय मुंडे (परळी), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.अनिल पाटील (अमळनेर), ॲड.अशोक पवार (शिरुर), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.बबनराव शिंदे (माढा), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), श्री.सिध्दार्थ शिरोळे (शिवाजीनगर), श्री.धर्मरावबाबा आत्राम (अहेरी), श्री.अजित पवार (बारामती), श्री.मनोहर चंद्रिकापूरे (अर्जुनी-मोरगांव), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.शेखर निकम (चिपळूण) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई येथील अरबी समुद्रातील शिवस्मारक उभारणी प्रकल्प आराखडा तयार करण्याची दिनांक २३ एप्रिल २०१६ रोजी सल्लागाराची नियुक्ती आणि रुपये २८०० कोटी इतकी प्रकल्पाची किंमत निश्चित करून तसेच एल & टी कंपनीला कार्यारंभ आदेश देऊन दिनांक २४ डिसेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास मा.पंतप्रधान, नरेंद्र मोदी यांच्या हस्ते जलपुजन करून शुभारंभ करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकल्पामुळे पर्यावरण व मासेमारी व्यवसायावर परिणाम होणार असल्याचे नमूद करुन पर्यावरण प्रेमी, मच्छिमार आणि काही सेवाभावी संस्थांनी त्याविरोधात मा.न्यायालयात याचिका दाखल केल्यावर मा.न्यायालयाने माहे जानेवारी, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान या प्रकल्पाच्या कामाला स्थगिती दिली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशाप्रमाणे दिनांक ११ जानेवारी, २०१९ पासून काम बंद असून सदर कामाची मुदत दिनांक १८ ऑक्टोबर, २०२१ रोजी संपत असल्याने न्यायालयीन स्थगिती व कोविद-१९ चा प्रादुर्भाव बघता कंत्राटदार मे.एल.अँड.टी.लि. यांना कोणतीही भाववाढ न देता एक वर्षासाठी दिनांक १८ ऑक्टोबर, २०२२ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, महालेखाकारांच्या नियमीत लेखापरिक्षणावेळी उपस्थित केलेल्या लेखाआक्षेपांचे अनुपालन विहित कार्यपध्दतीप्रमाणे करण्यात येऊन न्यायालयीन आदेशाच्या अनुषंगाने पुढील आवश्यक कार्यवाही करण्याचे शासनाचे नियोजन आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (२३-०२-२०२३) :** (१) होय,हे खरे आहे.

मुंबई येथील अरबी समुद्रातील शिवस्मारक उभारणी प्रकल्प आराखडा तयार करण्यासाठी दि.१३ एप्रिल, २०१६ रोजी मे.इजिस इंडिया प्रा.लि. यांना प्रकल्प सल्लागार म्हणून नेमण्यात आले. मा.पंतप्रधान यांच्या हस्ते दि.२४ डिसेंबर २०१६ रोजी जलपुजन करुन प्रकल्प कामाचा शुभारंभ करण्यात आला होता. Design-EPC (Design-Engineering-Procurement-Construction) तत्वावर कंत्राटदार मे.लार्सन ॲण्ड टुब्रो यांच्यासोबत रु.२५८१ कोटी+वस्तु व सेवा कर इतक्या रकमेसाठी करारनामा करुन त्यांना दि.१९/१०/२०१८ ही Commencement Date देण्यात आली आहे.
(२) होय, हे खरे आहे.
मा.सर्वोच्च न्यायालय येथे दाखल केलेल्या विशेष अनुमती याचिका प्रकरणामध्ये दि.११/०१/२०१९ रोजी झालेल्या सुनावणीवेळी मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशास अनुसरुन सध्या प्रकल्पाचे काम बंद आहे.
(३) होय, हे खरे आहे.
(४) होय, हे खरे आहे.
(५) व (६) दिनांक ३/३/२०२० रोजी मा.सर्वोच्च न्यायालयाने विशेष अनुमती याचिका निकाली काढून सदर याचिका मा.उच्च न्यायालय मुंबई येथे वर्ग केली आहे. मा.उच्च न्यायालय, मुंबई यांच्यामार्फत अद्याप सुनावणीची तारीख कळविण्यात आलेली नाही. सदर प्रकरणी सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत प्रतिज्ञापत्र मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे सादर करण्यात आले आहे.

---

## खामगाव बोथा बुलढाणा (जि.बुलढाणा) रस्त्याच्या निकृष्ठ बांधकामाबाबत

**(१५) ५०५७३ (१८-०१-२०२३). ॲड.आकाश फुंडकर (खामगांव) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खामगाव-बोथा-बुलढाणा (जि.बुलढाणा) रस्त्याचे काम बंद असून रस्त्याची दुरवस्था झाल्यामुळे मागील ६ महिन्यांपासून अपघात होऊन आजपर्यंत ७ ते ८ लोक मृत्युमुखी पडले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधित कंत्राटदारांना काळया यादीत टाकून त्यांचेवर मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (१७-०४-२०२३) :**(१) अंशत: खरे आहे.
सदर रस्त्याची एकूण मंजूर लांबी ४५.६५ कि.मी. असून यापैकी ३५.९७ कि.मी. लांबीचे काम पुर्ण झालेले आहे. उर्वरीत ९.६८ कि.मी. लांबीचे काम गौण खनिज उत्खनन परवानगी प्राप्त न झाल्याने काम पुर्ण करण्यास अडथळा निर्माण झाला आहे. कंत्राटदाराने अस्तित्वातील लांबीमधील खड्डे डांबराने भरले असून रस्ता वाहतूकीसाठी सुस्थितीत आहे.
पोलिस अहवालानुसार मागील ६ महिन्यांमध्ये घडलेल्या ४ अपघातांमध्ये मृत्यू पावलेल्यांची संख्या १ असून सदर अपघात हे वाहन चालकांच्या निष्काळजीपणामुळे घडलेले आहेत, असे नमूद केले आहे.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**श्री मलंगगड (ता.अंबरनाथ, जि.ठाणे) येथील फ्युन्या-क्यूलरट्रॉलीचे काम प्रलंबित असल्याबाबत**

**(१६) ५०८८४ (१८-०१-२०२३). श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.संजय केळकर (ठाणे), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्री मलंगगडावर(ता.अंबरनाथ, जि.ठाणे) येथील फ्युन्या-क्यूलरट्रॉलीचे काम अनेक वर्षापासून प्रलंबित असल्याने मा. सार्वजनिक बांधकाम मंत्री व अप्पर मुख्य सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय मुंबई यांचेकडे सन २०२१ मध्ये किमान चार वेळा बैठका घेऊन सुद्धा सदरचे काम अद्याप सुरु केले नसल्याचे निदर्शनास आले आहे,हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निदर्शनास आले व तदनुसार सदरचे काम ठरवून दिलेल्या अटी व शर्तीनुसार तसेच ठरवून दिलेल्या कालावधीत केले नसल्याने सुप्रिमो या ठेका घेतलेल्या कंपनीवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (१५-०३-२०२३) :**(१) होय हे खरे आहे.

तथापि, उद्योजकाने सप्टेंबर २०२२ पासून काम सूरु केले आहे.

(२) सवलत करारनामा संपुष्टात आणण्यासाठी उद्योजकास पत्र दिले आहे.उद्योजकाने शासनाच्या विरोधात मुंबई उच्च न्यायालयात पिटिशन दाखल केले आहे या संदर्भात मा.उच्च न्यायालयात सुनावणी झाली असून त्या मध्ये पुढील सुनावणी पूर्वी दोन्ही पक्षकारानी सर्व बाबीवर चर्चा करून शासनाने निर्णय घ्यावा त्या अनुषंगाने मुख्य अभियंता सा. बा. प्रा. वि. कोकण यांच्या कार्यालयात बैठक झाली उद्योजकाने मे २०२३ पर्यंत काम पूर्ण करून देण्याचे आश्वासन दिले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शिक्षण उपसंचालक, नाशिक यांनी गैरव्यवहार केल्याबाबत**

**(१७) ५०९२९ (१८-०१-२०२३). श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्री.बी .बी .चव्हाण, शिक्षण उपसंचालक, नाशिक यांनी मागासवर्गीय अधिकाऱ्यांचे हक्क डावलून पदोन्नती घेतल्याबाबत व वरिष्ठ लिपिक श्री. शेखर पाटील व कार्यालय अधिक्षक श्रीमती किरण कुवर यांनी वैयक्तिक मान्यता व शालार्थ (आय.डी.) देताना केलेला गैरव्यवहार प्रकरणी निलंबित करून विभागीय चौकशी करण्याबाबत दिनांक २८ सप्टेंबर,२०२२ रोजी वा त्या सुमारास लोकप्रतिनिधींनी मा .शिक्षणमंत्री यांना पत्र सादर केले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संदर्भात दोषी आढळणाऱ्या व्यक्तीवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे.

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर (२४-०२-२०२३) :** (१) होय.

(२) श्री.चव्हाण यांच्या पदोन्नतीची प्रक्रिया ही प्रचलित नियम व सामान्य प्रशासन विभागाने विहित केलेल्या कार्यपध्दतीनुसार व धोरणानुसार राबविण्यात आली असून कोणालाही डावलले गेलेले नाही.

शालार्थ क्रमांक देण्यात झालेल्या अनियमिततेची चौकशी करण्यासाठी शासन निर्णय दि.१.४.२०२१ अन्वये चौकशी समितीची पुनर्रचना करुन ४ पथकांची निर्मीती करण्यात आली होती.

सदर पथकांनी चौकशीअंती अहवाल आयुक्त, (शिक्षण) यांना सादर केला असून त्यानुषंगाने पुढील कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## देऊळगाव राजा (जि.बुलढाणा) येथील नागपूर-पुणे महामार्गाच्या रस्त्याची दुरवस्था झाल्याबाबत

**(१८) ५१२९५ (१८-०१-२०२३). श्री.संजय गायकवाड (बुलढाणा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देऊळगावराजा (जि.बुलढाणा) शहरातील नागपूर-पुणे महामार्गावर जागोजागी खड्डे पडले असून याप्रकरणी तक्रार केली असताना तात्पुरती डागडुजी करत असल्याप्रकरणी स्थानिकांनी दिनांक १९ सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास रास्ता रोको आंदोलन केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (१७-०४-२०२३) :**(१) होय.

(२) सदर लांबीत सुधारणा करणे बाबतच्या कामाचे अंदाजपत्रक मुख्य अभियंता तथा प्रादेशिक अधिकारी, केंद्रीय रस्ते वाहतुक व राजमार्ग मंत्रालय, कोकण भवन, नवी मुंबई यांचेकडे मंजुरीसाठी सादर करण्यात आले असुन मंजुरी प्राप्त होताच डांबरीकरणाने नुतनीकरणाचे काम हाती घेण्याचे नियोजन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुरुड (जि.रायगड) येथील शासकिय विश्रामगृहाची दुरवस्था झाल्याबाबत

**(१९) ५१३०७ (१८-०१-२०२३). श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोरोना काळात मुरुडच्या (जि.रायगड) शासकिय विश्रामगृहात सुरु करण्यात आलेले कोविड केंद्र अद्याप सुरु असल्याचे माहे ऑक्टोंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सद्यस्थितीत या इमारतीची दुरवस्था झाली असून लाखो रुपयांचे साहित्य धुळ खात पडून असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुरुड जंजिरा हे पर्यटन स्थळ असल्याने येथे अनेक शासकिय अधिकारी, कर्मचारी व पर्यटक येत असल्याने त्यांच्या निवासाची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने विश्रामगृहातील कोविड केंद्र बंद करुन त्याची दुरुस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (०५-०४-२०२३) :** (१) सन २०२० मध्ये कोरोना महामारीमुळे तहसिलदार तथा प्रमुख आपत्ती व्यवस्थापन समिती, मुरुड यांनी शासकिय विश्रामगृह मुरुड (जि.रायगड) ही इमारत क्वारंटाईन सेलसाठी ताब्यात घेतली होती. तद्नंतर, शासकीय विश्रामगृहात सुरु करण्यात आलेल्या कोविड केंद्राचा ताबा अद्यापही तालुका आरोग्य अधिकारी, मुरुड यांचेकडे आहे.

(२) होय. हे खरे आहे.

कोरोना काळात तालुका आरोग्य अधिकारी, मुरुड जंजिरा यांचेकडून ठेवण्यात आलेले साहित्य (बेड, गादया, चादरी, उशा इ.) हे अद्याप पडून असल्याचे निदर्शनास येते.

(३) होय. हे खरे आहे.

कोरोना काळात तालुका आरोग्य अधिकारी, मुरुड जंजिरा यांचेकडून ठेवण्यात आलेला ताबा अद्यापपर्यंत सार्वजनिक बांधकाम विभागास हस्तांतरित न केल्याने, शासकीय अधिकारी,कर्मचारी व पर्यटक यांची विश्रामगृह आरक्षणाची मागणी पूर्ण करता येत नाही.

(४) सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत विश्रामगृहातील साहित्य काढणेसाठी तालुका आरोग्य अधिकारी यांना वेळोवेळी विनंती करण्यात आली आहे. तहसीलदार, मुरुड जंजिरा यांनी दिनांक २०.१०.२०२२ रोजीच्या पत्रान्वये तालुका आरोग्य अधिकारी यांना विश्रामगृहातील साहित्य ताब्यात घेऊन, विश्रामगृहाचा ताबा त्वरित सार्वजनिक बांधकाम विभागास देण्याबाबत कळविले आहे. सदर विश्रामगृहाचा ताबा तालुका आरोग्य अधिकारी, मुरुड जंजिरा यांचेकडून मिळाल्यानंतर, विश्रामगृह दुरुस्ती करण्याचे नियोजन आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पांढरकवडा ( जि.यवतमाळ) येथील राज्य मार्ग या लेखाशिर्षाअंतर्गत कामांवर करण्यात आलेल्या अतिरिक्त खर्चाबाबत**

**(२०) ५१५५० (१८-०१-२०२३). श्री.नामदेव ससाणे (उमरखेड) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पांढरकवडा (जि.यवतमाळ) येथील राज्य मार्ग या लेखाशिर्षाअंतर्गत कामांवर करण्यात आलेल्या अतिरिक्त ज्यादा खर्चाचा खुलासा सादर करण्याच्या कारणे दाखवा नोटीस माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान देण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी खुलासा सादर करण्यात आला आहे काय, खुलाश्यात कोणत्या बाबी नमूद करण्यात आल्या आहेत,

(३) असल्यास, खुलाश्यात काय आढळून आले व त्यानुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (१८-०५-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) सदरचे कामांचे करारनाम्यात नमूद बाब निहाय परिमाणाचे अधिक्यास व आकस्मीक खर्चास सक्षम प्राधिका-याची मान्यता घेतली नसल्याचे खुलाश्यात नमूद आहे. या करीता संबंधीतास सक्त ताकिद देण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भभवत नाही.

---

**माढा (जि.सोलापूर) येथे प्रशासकीय इमारतीच्या कामास विलंब होत असल्याबाबत**

**(२१) ५१७३४ (२७-०१-२०२३). श्री.बबनराव शिंदे (माढा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाकडून माढा (जि.सोलापूर) येथे प्रशासकीय भवन बांधण्यासाठी माहे फेब्रुवारी, २०२० मध्ये वा त्या दरम्यान अर्थसंकल्पात १३ कोटी रुपये मंजूर करण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,माढा तालुक्यातील १०९ गावांतील नागरीकांचे महसूल, कृषी, वन, सिटी सर्वे, ट्रेझरी, दुय्यम सहाय्यक निबंधक व सहाय्यक निबंधक अशी महत्वाची शासकीय कार्यालये वेगवेगळ्या ठिकाणी कार्यरत असल्याने नागरीकांचा आर्थिक भुर्दंड तसेच वेळ वाया जातो, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त इमारत तयार व्हावी म्हणून सन २०२० मध्ये वा त्यादरम्यान मंजूर कामाची माहे फेब्रुवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान कार्यारंभ आदेश तयार केला असूनही अद्यापी महसूल विभागाचे दप्तर दिरंगाईमुळे प्रशासकीय भवन इमारत होण्यास विलंब होत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, प्रशासकीय इमारतीचे बांधकाम तातडीने करून नागरीकांचा त्रास कमी करण्यासाठी शासनाकडून आवश्यक त्या परवानग्या देऊन प्रत्यक्ष काम सुरु करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. रविंद्र चव्हाण (२१-०३-२०२३) :** (१) होय,हे खरे आहे. माढा येथे प्रशासकीय भवन बांधण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभाग,महाराष्ट्र शासन निर्णय क्र.बी.डी.जी.२०२०/प्र.क्र.९६/इमारती-३ मंत्रालय मुंबई-३२ दि.२७.०२.२०२० अन्वये रु.१३११.३२ लक्ष रकमेस प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) (४) व (५) सदर नवीन इमारत अस्तित्वातील जुनी इमारत पाडून बांधावयाची आहे.अस्तित्वातील जुन्या इमारतीतील तहसील कार्यालय अन्य इमारतीमध्ये माहे जानेवारी २०२३ मध्ये स्थलांतरित करण्यात आले आहे.अस्तित्वातील इमारत पाडण्यासाठी महसूल व वन विभागामार्फत दि.१३.०२.२०२३ रोजी परवानगी देण्यात आली आहे. त्यास अनुसरुन अस्तित्वातील जुनी तहसील इमारत पाडून त्या ठिकाणी नवीन प्रशासकीय इमारत बांधण्यात येत आहेत.

---

### दफ्तर दिरंगाई बाबत तत्कालीन शिक्षण मंडळाचे नाशिक महानगरपालिकेचे प्रशासनाधिकारी यांचे चौकशीबाबत

**(२२) ५१८०२ (२७-०१-२०२३). श्री.नितीन अर्जुन (ए.टी.) पवार (कळवण) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक महापालिकेच्या शिक्षण विभागाचे तत्कालीन प्रशासनाधिकारी श्री. नितीन उपासनी यांनी केलेल्या दप्तर दिरंगाईबाबत तत्कालीन श्री.आयुक्त तुकाराम मुंढे यांनी प्रशासनाधिकारी यांच्यावर ठपका ठेवत खातेअंतर्गत चौकशी सुरु करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी सन २०१८ मध्ये यासंदर्भात शिक्षण संचालक कार्यालय, पुणे येथे प्रस्ताव सादर करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या संपूर्ण प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने दोषी आढळून आलेल्यां विरूध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर (०९-०५-२०२३) :** (१), (२) व (३)
सदर प्रकरणी विभागीय चौकशीचा प्रस्ताव आयुक्त, शिक्षण यांचेकडून प्राप्त झाला होता. तथापि, प्रस्ताव तपासला असता नाशिक महानगरपालिकेवर कोणताही आर्थिक भार निर्माण झाल्याचे किंवा शासनाचे आर्थिक नुकसान झाल्याचे आढळून आले नाही.
यास्तव दोषारोपांचे गांभीर्य व स्वरुप तसेच उपलब्ध कागदपत्रे विचारात घेता, भविष्यात अशा स्वरुपाची अनियमितता होणार नाही यादृष्टीने श्री.उपासनी यांना सक्त ताकीद देऊन प्रकरण बंद करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### बीड जिल्ह्यातील दोषी रास्त भाव दुकानदारांवर कारवाई करण्याबाबत

**(२३) ५२०५९ (१८-०१-२०२३). श्री.प्रकाश (दादा) सुंदरराव सोळंके (माजलगांव) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बीड जिल्ह्यातील माहे २०२२ साठी अन्न सुरक्षा व PMGKAY धान्य मागणी न करणेबाबत जिल्हा पुरवठा अधिकारी यांनी दिनांक १८ ऑक्टोबर, २०२२ रोजीच्या पत्रान्वये तहसीलदार, अंबेजोगाई, आष्टी, गेवराई (जि.बीड) यांना कारणे दाखवा नोटीस दिली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बीड जिल्ह्यातील रास्त भाव दुकानांमार्फत त्यांचे दुकानाशी संलग्न शिधावस्तु धारकांना अन्न सुरक्षा योजनेसह प्रधानमंत्री गरीब कल्याण योजनेचा लाभ शासन नियमाप्रमाणे देण्यात येत आहे किंवा कसे याची पडताळणी करण्यासाठी सहा. पुरवठा अधिकारी, बीड पथक प्रमुख यांच्या देखरेखीखाली दिनांक ३० सप्टेंबर, २०२२ ते २७ ऑक्टोबर, २०२२ या कालावधीमध्ये तपासणी करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, बीड जिल्ह्यात एकुण स्वस्त धान्य दुकानदारांपैकी किती दुकानदारांनी प्राधिकरण पत्राचे माहे सप्टेंबर २०२२ अखेर नुतनीकरण केले तसेच नुतनीकरण नसताना देखील धान्य वाटप करण्यात आले आहे काय, असल्यास संबंधित दोषींविरुद्ध कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास, प्रश्न भाग १ मधील तहसिलदारांविरुध्द कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे तसेच प्रश्न भाग २ मधील बीड जिल्ह्यातील किती स्वस्त धान्य दुकानांची तपासणी करण्यात आली आहे, सदर तपासणीमध्ये किती स्वस्त दुकाने दोषी आढळून आली आहेत व त्यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (२६-०४-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) जिल्हा पुरवठा कार्यालय, बीड येथे प्राप्त झालेल्या ६८६ रास्त भाव दुकानदार यांचे प्राधिकारपत्राचे नुतनीकरण करण्यात आले आहे. तसेच परवाना नुतनीकरण केलेले नसल्यास त्यांचेविरुध्द नियमाधिन कारवाई करणेबाबत जिल्हा पुरवठा अधिकारी, बीड यांच्या दि. ४.७.२०२२ रोजीच्या पत्रान्वये सर्व तहसिलदार जिल्हा-बीड यांना लेखी कळविण्यात आले.
(४) तहसिलदार आंबेजोगाई, आष्टी, गेवराई यांना नोटीस दिल्यानंतर त्यांनी त्याच दिवशी दि. १८.१०.०२२ रोजी धान्य मागणी करून नियतन काढून संपूर्ण उचल व वाटप करण्यात आल्यामुळे नोटीशीच्या अनुषंगाने अनुपालन झाल्यामुळे तहसीलदार यांचेवर कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही.
बीड जिल्ह्यातील एकुण ११३ रास्त भाव धान्य दुकानांची तपासणी करण्यात आली आहे. त्यापैकी १० रास्त भाव दुकानदार यांचे १००% प्राधिकारपत्राची अनामत रक्कम जप्त करून दंडात्मक कारवाई करण्यात आलेली असून एका रास्त भाव दुकानाचे प्राधिकारपत्र निलंबित करण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## दक्षिण नागपूर व कामठी मतदार संघाला जोडणाऱ्या मुख्य रस्त्याच्या प्रलंबित कामांबाबत

**(२४) ५२२१२ (१८-०१-२०२३). श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दक्षिण नागपूर व कामठी मतदार संघाला जोडणारा पिपळा रोड मुख्य रस्त्याचे बांधकाम मागील ३ वर्षापासून प्रलंबित असून रस्त्यावरील खड्डयांमुळे अनेक दुर्घटना घडत असतानाही याकडे प्रशासनाचे दुर्लक्ष होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या रस्त्याच्या बांधकमाकरिता आवश्यक असलेल्या निधीचा प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदर रस्त्याची प्रलंबित कामे तातडीने पूर्ण करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (११-०५-२०२३) :** (१) सदर रस्ता प्रमुख जिल्हा मार्ग दर्जाचा असून रस्त्याची लांबी २.८ कि.मी. आहे. सदर रस्त्यावर १.२३० कि.मी. लांबीत डांबरी नुतनीकरणाचे काम पूर्ण करण्यात आले आहे. उर्वरित १.४० कि.मी. लांबीतील रस्त्यावरील खड्डे वेळोवेळी भरण्यात आले आहेत. ०.१७० कि.मी. लांबीत डांबरी नुतनीकरणाचे काम न्यायप्रविष्ठ असल्याने कार्यान्वयीत करता आले नाही. तथापि, या लांबीतील खड्डे भरुन रस्ता वाहतुकीकरीता सुस्थिती ठेवण्यात आला आहे.
रस्त्यावरील दोन अपघात वाहनचालकाने वाहन भरधाव वेगाने चालवून धडक दिल्याने झाले असल्याची नोंद संबंधित पोलीस स्टेशन मधील FIR मध्ये आहे.
(२) उपलब्ध होणारा निधी प्रमाणशीर पध्दतीने वितरीत करण्यात येतो.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वलगाव (जि.अमरावती) येथील रेल्वेपूलाची दुरुस्ती करण्याबाबत**

**(२५) ५२२३५ (१८-०१-२०२३). श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमित झनक (रिसोड), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती परतवाडा मार्गावरील वलगाव (जि.अमरावती) येथील रेल्वेपूलावर प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे मोठे खडडे पडले असून काही खडडयांमधून लोखंडी रॉड बाहेर आल्यामुळे वाहतुकीला धोका निर्माण होऊन जिवितहानी होण्याची शक्यता निर्माण झाली असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ च्या दुसऱ्या आठवडयात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने पुलाची तातडीने दुरुस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (१६-०३-२०२३) :** (१) होय , हे खरे आहे.

(२) विषयांकीत रेल्वे पुल व पोचमार्गाचे बांधकाम रेल्वे विभागामार्फत करण्यात आले आहे. तथापि, रस्त्यावरील रेल्वे पुल व पोच रस्त्यावर खड्डे निर्माण होत असल्याची बाब लक्षात येताच वाहतुकीस अडथळा निर्माण होऊ नये म्हणून सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत वेळोवेळी रेल्वे पूलाच्या पृष्ठभागावर व पोचमार्गावरील खड्डयांची दुरुस्ती करण्यात येते. सद्यस्थितीत रेल्वे पूल व पोचमार्ग खड्डे विरहीत असून पोचमार्गावरुन वाहतूक सुरळीत सुरु आहे.

प्रश्न उद्भवत नाही.

---

**नांदेड ते वाहेगाव-बेट (ता.जि.नांदेड) रस्त्याचे काम प्रलंबित असल्याबाबत**

**(२६) ५२४०० (१८-०१-२०२३). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड ते वाहेगाव-बेट (ता.जि.नांदेड) या रस्त्याचे मजबूतीकरण व डांबरीकरणाचे काम गत ३ वर्षापासून अपूर्ण अवस्थेत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदर रस्त्याचे काम त्वरीत पूर्ण करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (१९-०४-२०२३) :**(१) नांदेड ते वाहेगाव-बेट असा रस्ता अस्तित्वात नाही. तथापि, नांदेड जिल्हयातील मालेगांव–लिंबगांव-जैतापूर-सोनखेड, प्रजिमा-२२ या मार्गावर वाहेगांव (मोहनपुरा) गावाजवळ पुलाचे बांधकाम करण्याचे काम मंजूर आहे.

सदर काम प्रगतीत असून माहे जून, २०२३ पर्यंत पुर्ण करण्याचे नियोजन आहे.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## लातूर-रेणापूर-पानगांव (जि.लातूर) रस्त्याच्या दुरवस्थेबाबत

**(२७) ५२४०२ (१८-०१-२०२३). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर जिल्हयातील लातूर-रेणापूर-पानगांव या राज्य महामार्गावरुन जड वाहने जात असल्याने रस्त्याची मोठया प्रमाणात दुरवस्था झाली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरच्या रस्त्याची शासनामार्फत पहाणी केली आहे काय, पाहणीचे निष्कर्ष काय आहेत व तद्नुसार सदर रस्त्याची दुरुस्ती करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (१०-०४-२०२३) :**(१) व (२) लातूर जिल्ह्यातील लातूर-रेणापूर-पानगांव या महामार्गावरील खारोळा फाटा ते पानगाव या लांबीत रस्ता काही ठिकाणी खराब झाल्याचे तसेच रस्त्यावर खड्डे पडल्याचे आढळून आले. सदरील लांबीत खड्डे भरुन रस्ता तात्पुरता सुव्यवस्थित करण्यात आलेला आहे. सदर लांबीमध्ये प्रस्तावित कामाचे अंदाजपत्रक प्रादेशिक अधिकारी, रस्ते परिवहन व महामार्ग मंत्रालय,मुंबई यांचेकडे मंजुरीस्तव सादर केले असुन, सदर प्रस्ताव मान्य झाल्यानंतर काम हाती घेण्याचे नियोजन आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## बडनेरा, चांदुर रेल्वे व धामणगाव रेल्वे (जि.अमरावती) येथील रस्त्यांच्या कामांना निधी उपलब्ध करून देण्याबाबत

**(२८) ५२७९९ (१८-०१-२०२३). श्री.प्रताप अडसड (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती सार्वजनिक बांधकाम विभागा अंतर्गत येणा-या उपविभाग बडनेरा, चांदुर रेल्वे व धामणगाव रेल्वे येथील रस्त्यांची दयनीय अवस्था झाली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त रस्त्यांची कामे अर्थसंकल्पात समाविष्ट करून निधी उपलब्ध करून देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी (धामनगाव रेल्वे) यांनी मा.उप मुख्यमंत्री यांना दिनांक ९ फेब्रुवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त मागणीनुसार सदरहू कामांचा समावेश अर्थसंकल्पात करून निधी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. रविंद्र चव्हाण (२०-०३-२०२३) :** (१) हे खरे नाही.
सदर रस्त्यांवरील मंजूर कामे पूर्ण करण्यात येऊन, रस्त्यांवरील खड्डे भरुन रस्ते वाहतुकीसाठी योग्य ठेवण्यात आलेले आहेत.
(२) हे खरे आहे.
(३) प्राप्त निवेदनाच्या अनुषंगाने ११ मंजूर कामे प्रगतीत आहेत.
उर्वरीत कामे निकष, मंजूरी व निधी उपलब्धतेच्या अधीन राहून हाती घेण्याचे नियोजन राहील.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रावणवाडी- बिर्सी - कामठा-आमगाव (जि.गोंदिया) राष्ट्रीय महामार्ग ३६५ ची दुरवस्था झाल्याबाबत**

**(२९) ५२९७८ (१८-०१-२०२३). श्री.सहसराम कोरोटे (आमगाव) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोंदिया जिल्हा अंतर्गत आमगाव विधानसभा क्षेत्रातील रावणवाडी- बिर्सी - कामठा आमगाव रस्ता राष्ट्रीय महामार्ग ३६५ हा एक महत्त्वपूर्ण रस्ता असून त्याची लांबी २९ किलोमीटर आहे सदर रस्ता गोंदिया बालाघाट रस्ता राष्ट्रीय महामार्ग ५४३ ला जोडलेला असून सदर रस्त्यावर रावणवाडी, बिर्सी विमानतळ, आमगाव तालुका असे महत्त्वाचे स्थळ जोडलेले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील रस्ता अत्यंत खराब झाला असून या रस्त्याचे काम हे आशियाई विकास बँक योजनेंतर्गत प्रस्तावित असून आशियाई विकास बँकच्या अर्थसहाय्याने करावयाच्या कामांची अंतिम यादी तयार करण्याचे काम पुर्ण झाले आहे काय,

(३) तसेच सदरहू रस्त्याच्या रुंदीकरण व दुरुस्तीसाठी आशियाई विकास बँक योजनेंतर्गत कामे समाविष्ट करतांना आवश्यक निकषांची तपासणी व प्रकल्पांतर्गत समाविष्ट करुन प्राधान्यक्रम आणि निधी उपलब्धतेच्या अधीन राहून शासनाने कोणते नियोजन केले आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (२१-०४-२०२३) :** (१) होय , हे खरे आहे.

(२) आशियाई विकास बँकअर्थसहायित टप्पा-३ साठी अर्थसहाय्य प्राप्त करुन घेण्याची प्रक्रिया प्रगतीत आहे.

(३) प्रश्नाधीन रस्त्याच्या बांधकामाबाबत आशियाई विकास बँकेचे निकष, मंजूरी व निधी उपलब्धतेच्या अधीन राहून काम हाती घेण्याचे नियोजन राहील.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नांदेड जिल्हयातील राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियमांतर्गत शिधापत्रिका धारकांना धान्य मिळत नसल्याबाबत**

**(३०) ५३६४३ (१८-०१-२०२३). श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्हयातील राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियमांतर्गत शिधापत्रिकाधारकांना धान्य मिळत नसल्याची बाब माहे नोव्हेंबर, २०२२ वा त्या दरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हयातील गोदामातून माहे एप्रिल-२०२१ ते ऑक्टोबर-२०२२ या कालावधीत किती क्विंटल गहु व तांदूळ या योजनेतंर्गत वितरीत किंवा व्यपगत करण्यात आलेला आहे तसेच वरील कालावधीत वाटप न झालेले किंवा धान्य व्यपगत होण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, धान्य न मिळालेल्या शिधाधारकांना सदर धान्याचे बाजार भावाने पैसे देण्याची तरतूद आहे, सदर तरतुदीनुसार धान्य न मिळालेल्या किती शिधाधारकांना पैसे देण्यात आले वा देण्यात येणार आहेत तसेच या कालावधीत धान्य न मिळाल्यामुळे किती शिधाधारकांचा मृत्यू झाला आहे,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (२९-०३-२०२३) :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

माहे एप्रिल, २०२१ ते ऑक्टोबर, २०२२ या कालावधीत नांदेड जिल्ह्यातील व्यपगत झालेल्या अन्नधान्याची माहिती खालीलप्रमाणे :

| महिना | व्यपगत गहू (आकडे क्विंटलमध्ये) | व्यपगत तांदूळ (आकडे क्विंटलमध्ये) |
|---|---|---|
| एप्रिल, २०२१ | १०२१०.१० | ० |
| नोव्हेंबर, २०२१ | ३४६७.५८ | ३०५८१.५४ |
| डिसेंबर, २०२१ | ९३४८.४१ | ० |
| जानेवारी, २०२२ | २१८२८.७७ | ३४१.९२ |
| फेब्रुवारी, २०२२ | ४१३९९.३७ | २४१४.४७ |
| मार्च, २०२२ | २०३५१.३१ | २७७०९.४६ |
| मे, २०२२ | ० | ३७६२७.०१ |
| जून, २०२२ | ० | ६८८०१.८४ |
| जुलै, २०२२ | ० | २७४५१.७० |

गोदामातील अपुरी जागा, हमालीचा अडथळा, भारतीय अन्न महामंडळाकडून उचल वेळेवर न मिळणे, CMR तांदळाची अनुपलब्धता, कंत्राटदाराकडून अपेक्षित क्षमतेने वाहने उपलब्ध करून न मिळणे इ. कारणांमुळे धान्य व्यपगत झालेले आहे.

(३) कोठल्याच शिधापत्रिकाधारकाने धान्य न मिळाल्याबाबत तक्रार केलेली नाही किंवा जिल्हा तक्रार निवारण अधिकारी यांच्याकडे तक्रार अर्ज केलेला नाही. अन्नधान्य न मिळाल्याने नांदेड जिल्ह्यातील पात्र लाभार्थ्यांचा मृत्यू झाल्याची घटना निदर्शनास आलेली नाही.

(४) धान्य न मिळाल्याची तक्रार प्राप्त नसल्याने त्याबाबत चौकशी करण्याचा प्रश्न उद्भवत नाही. मात्र, शासन निर्णय २०.४.२०१७ मधील तरतूदीनुसार वाहतुक कंत्राटदारावर व्यपगत धान्याबाबत नियमानुसार दंडात्मक कारवाई करण्याबाबत जिल्हाधिकारी नांदेड यांच्याकडे कार्यवाही सुरू आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**परभणी - गंगाखेड राष्ट्रीय महामार्गाची झालेली दुरवस्था**

**(३१) ५३७५० (२६-१२-२०२२). श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व), डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी-गंगाखेड या रस्त्याचे राष्ट्रीय महामार्गात रूपांतरण करुन या मार्गाचे दोन वर्षापूर्वी रूंदीकरण करून सिमेंट काँक्रीटीकरण करण्यात येऊनही रस्त्याला ठिकठिकाणी भेगा पडल्या असल्यामुळे नागरीकांची गैरसोय होत असून अपघातांच्या संख्येतही मोठया प्रमाणात वाढ झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महामार्गाच्या अनुषंगाने दैठणा गावात जाण्यासाठी एकही वळण रस्ता देण्यात आलेला नसणे तसेच दुभाजकाचे काम अर्धवट अवस्थेत असल्यामुळे गत तीन महिन्यात १३ अपघातात ८ प्रवाश्यांना आपला जीव गमवावा लागला असून ३० जण गंभीर जखमी झाले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू रस्त्याचे रूंदीकरण व सिमेंट काँक्रिटीकरणाचे कामाबाबत कंत्राटदाराने दिलेल्या हमीपत्रातील अटी शर्तींचे उल्लंघन होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू मार्गाच्या दुरूस्तीचे काम पूर्ण करणे तसेच दैठणा गावात जाण्यासाठी वळण रस्ता व अर्धवट अवस्थेत असलेल्या दुभाजकाचे काम करण्याबाबत तसेच संबंधित कंत्राटदारावर कारवाई करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (१७-०४-२०२३) :**(१) होय.

काँक्रीट रस्त्याला काही ठिकाणी भेगा पडल्या आहेत. सदर भेगांची दुरुस्ती IRC-८३ मानकाप्रमाणे कंत्राटदारामार्फत स्वखर्चाने करण्यात येत आहे. परंतु, या भेगांमुळे अपघातांच्या संख्येत वाढ झाल्याचे पोलिस अहवालानुसार दिसून येत नाही.

(२) परभणी गंगाखेड या रस्त्याच्या दुपदरी काँक्रिटीकरण कामाच्या वावानुसार दैठणा गावाजवळ वळण रस्त्याचे बांधकाम अंतर्भूत नाही. सदर कामाच्या मंजुर अंदाजपत्रकानुसार दैठणा गावाजवळ दहा मीटर रुंदीचा सिमेंट काँक्रिट रस्ता तसेच या दुपदरी रस्त्याच्या दोन्ही बाजूस गावातील लांबीत ९०० मीटर लांबीचे व ५.५० मीटर रुंदीचे सर्व्हीस रस्ते बांधण्यात आले आहेत. सर्व्हीस रस्ते व मुख्य महामार्गामध्ये काँक्रिट कर्बींग व डेलीनेटर बसविण्यात आले आहेत. उक्त बाबीमुळे स्थानिक वाहतूक व महामार्गाची वाहतूक यांचे विभाजन होत असून, सुरक्षित वाहतूक होत आहे. पोलीस अहवालानुसार सदर अपघात हे वाहन चालकांच्या हयगय व निष्काळजीपणामुळे झाल्याचे नमूद केले आहे. सदर गाव लांबीमध्ये काही ठिकाणी स्थानिक दुकानदारांनी कर्बींग व डेलीनेटर तोडल्याचे दिसून आल्यानंतर , लगेच सदर ठिकाणी काँक्रिटी कर्बींग व डेलीनेटर पुनश्च: बसविण्यात आले आहेत.

(३) हे खरे नाही.

(४) काँक्रिट पॅनल दुरुस्तीचे काम कंत्राटदारामार्फत स्वखर्चाने प्रगतीपथावर असून (९० टक्के काम पूर्ण) रस्ता दुभाजक व डेलीनेटरचे काम पूर्ण करण्यात आले आहे. वळण रस्त्याचे काम मूळ मंजूर कामात अंतर्भूत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई-गोवा महामार्गावर अवैध पार्किंगचे प्रमाण वाढत असल्याबाबत

**(३२) ५३७७९ (१८-०१-२०२३). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-गोवा महामार्गावर अवैध पार्किंगचे प्रमाण वाढत असल्याचे माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या महामार्गावर अवैध पार्किंग करण्यात येणाऱ्या वाहनांमुळे मोठया प्रमाणात अपघाताचे प्रमाण वाढत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार अवैध पार्किंगला आळा घाण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली तसेच अनधिकृत पार्किंग करणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (११-०५-२०२३) :**(१) होय.

(२) व (३) गृह विभागाच्या अहवालानुसार मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग क्र.६६ वर माहे नोव्हेंबर २०२२ वा त्यासुमारास अवैध पार्किंगमुळे अपघात झालेले नाहीत.

तसेच मुंबई गोवा महामार्गावर नियमितपणे गस्त करण्यात येत असुन अवैध पार्किंग करणाऱ्या वाहनांवर मोटार वाहन कायदृयान्वये केसेस करण्यात येत असुन यापुढेही अवैध पार्किंग आढळुन आल्यास कारवाई करण्यात येणार आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सोलापूर जिल्ह्यातील शासकीय तंत्रनिकेतनमधील तासिका तत्त्वावर काम करणाऱ्या अभिव्याख्यात्यांच्या मानधनाबाबत

**(३३) ५३९९९ (१८-०१-२०२३). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्ह्यातील शासकीय तंत्रनिकेतन मध्ये तासिका तत्त्वावर काम करणाऱ्या अभिव्याख्यात्यांना माहे जानेवारी,२०२२ मध्ये वा त्या दरम्यान मानधन मिळाले नसल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मागील पाच-सहा वर्षापासून अत्यंत कमी मानधनावर तासिका तत्त्वावर काम करणाऱ्या उच्चशिक्षित अभिवाख्यात्यांना नियमित वेतन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) पाटील (२४-०३-२०२३) :** (१) होय.
शासकीय तंत्रनिकेतन, सोलापूर येथे तासिका तत्वावर काम करणाऱ्या अधिव्याख्यात्यांना माहे जानेवारी, २०२२ चे मानधन माहे जुलै, २०२२ मध्ये अदा करण्यात आले आहे.
(२) व (३) तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील विविध संस्थांमध्ये तासिका तत्वावर कार्यरत असणाऱ्या अभ्यागत अध्यापकांना दि.१७/०३/२०१७ च्या शासन निर्णयान्वये निश्चित करण्यात आलेल्या दरानुसार व अर्थसंकल्पित करण्यात आलेल्या तरतुदीतून मानधन देण्यात येते.

तथापि, शासकीय तंत्रनिकेतन, सोलापूर येथील तासिका तत्वावर काम करणाऱ्या अधिव्याख्यात्यांनी त्यांच्या मानधनाची देयके व आवश्यक कागदपत्रे संस्थेस विलंबाने सादर केली असल्याने त्यांना मानधन अदा करण्यास विलंब झालेला आहे. याबाबत संस्थेत तासिका तत्वावर कार्यरत असलेल्या सर्व अभ्यागत अधिव्याख्यात्यांना प्रत्येक महिन्याच्या ०५ तारखेपर्यंत मानधनविषयक कागदपत्रे सादर करण्यासंदर्भात प्राचार्यांकडून लेखी सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

---

**औरंगाबाद ते जळगांव (जि.औरंगाबाद) महामार्ग क्रमांक आठचे काम प्रलंबित असल्याबाबत**

**(३४) ५४७९९ (१८-०१-२०२३). श्री.प्रदीप जैस्वाल (औरंगाबाद मध्य) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औरंगाबाद ते जळगांव (जि.औरंगाबाद) महामार्ग क्रमांक आठचे काम गत सात वर्षापासून प्रलंबित असल्याचे माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, फुलंब्री (जि.औरंगाबाद) तालुक्यात आठ ठिकाणी रस्त्यांचे काम अपूर्ण असल्याने या रस्त्यावर अपघातांचे प्रमाण वाढले असल्याने सदरहू काम तातडीने पूर्ण करण्याच्या मागणीकरिता नागरिकांनी तीव्र आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (१७-०४-२०२३) :**(१) अंशत: खरे आहे.
सदर रस्त्याचे दुपदरीकरणाचे काम सुरुवातीला सन २०१७ मध्ये मंजुर करण्यात आले होते. तथापि सदर कामाच्या भूमी पुजनावेळी स्थानिक लोक प्रतिनिधीच्या मागणीनुसार या रस्त्याचे चौपदरीकरण करण्याची घोषणा करण्यात आली. सदर चौपदरीकरणाच्या प्रस्तावास केंद्र शासनाकडून मंजुरीसाठी दीड ते दोन वर्षे कालावधी लागला, तसेच सन २०२०-२१ मध्ये करोना महामारीमुळे कामाची मंदावलेली प्रगती वन विभागाची परवानगी व भूसंपादन इ.कारणांमुळे सदर कामास विलंब झाला. सद्यस्थितीत ९० टक्के काम पुर्ण झालेले आहे.
(२) हे खरे नाही.

फुलंब्री तालुक्यातील मौ.बिल्डा,महालकिन्होळा,फुलंब्री या गावातील भूसंपादनाचे काम प्रगतीत असल्याने सदर ठिकाणची कामे प्रलंबित होती. सद्यस्थितीत मौ.बिल्डा, फुलंब्री येथील काम झालेले आहे. दि.२०.११.२०२२ रोजी भूसंपादन अधिकारी यांनी जमीन हस्तांतरण झाल्यानंतर काम चालू झालेले असून वाहतूक सुरळीत चालू आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पाचोरा-तारखेडा (जि.जळगांव) रस्त्यासाठी जमिन अधिग्रहण करुन पर्यायी रस्त्यांची व्यवस्था करण्याबाबत**

**(३५) ५५०६९ (१८-०१-२०२३). श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगांव जिल्हयातील पाचोरा-तारखेडा रस्ता प्रजिमा-३७ कि.मी. २९/९२२ ते ३३/४०० या रस्त्यासाठी रेल्वे लगतची जमिन अधिग्रहण करुन पर्यायी रस्त्यांची व्यवस्था करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २८ सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्या सुमारास मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री, महाराष्ट्र राज्य यांना लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच जळगांव जिल्हयातील पाचोरा-भडगांव येथे रेल्वे ओव्हर ब्रीज ला सन २०२२-२०२३ च्या पुरवणी अर्थसंकल्पात मंजूरी देऊन निधी उपलब्ध करुन देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २७ जुलै ,२०२२ रोजीवा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री यांचेकडे लेखी निवेदनाव्दारे मागणी केली हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (१५-०५-२०२३) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) पाचोरा- तारखेडा रस्त्याची एकुण लांबी ६.१८ कि.मी. असून त्यापैकी ४.६३ कि.मी. रस्ता हा रेल्वे हद्दीतून जातो. भुसावळ ते मनमाड रेल्वे लाईन दुपदरी असून ३ री व ४ थी लाईन टाकण्याचे काम प्रगतीत असल्याने रेल्वे हद्दीतील सदरचा रस्ता बंद होण्याची शक्यता आहे. सदर रस्ता रेल्वे हद्दीच्या बाहेर नव्याने बनवायचे ठरविल्यास सुमारे रु. ७० ते ८० कोटी इतकी रक्कम भूसंपादनाकरिता आवश्यकता आहे. तथापि, पाचोरा- तारखेडा या रस्त्याऐवजी पाचोरा- सारोळा तारखेडा या रस्त्याने वाहतूक करता येऊ शकते. या रस्त्याने वाहतूक केल्यास फक्त १.४६ कि.मी. इतके अंतर जास्त आहे. पाचोरा ते सारोळा हा राज्यमार्ग असून सारोळा ते तारखेडा या ग्रामीण मार्गाच्या दुरुस्तीचे काम मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेद्वारे प्रस्तावित करण्यात आले आहे.

पाचोरा- भडगांव येथे रेल्वे ओव्हर ब्रीज बांधण्याच्या संदर्भात मध्य रेल्वेकडे पाठपुरावा करण्यात आला असता, रेल्वे विभागांतर्गत भुयारी मार्गाचे काम (RUB) मंजूर असून सद्य:स्थितीत ते निविदा स्तरावर असून जमीन अधिग्रहण करण्याची कार्यवाही सुरु असल्याचे वरिष्ठ विभागीय अभियंता,उत्तर विभाग, मध्ये रेल्वे, भुसावळ यांनी कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चेक नापुर (सकमुर) (ता.गोंडपिंपरी,जि.चंद्रपूर) येथील रस्ता रुंदीकरणासाठी संपादित करण्यात आलेल्या जमिनीचा शेतक-यांना मोबदला देण्याबाबत**

**(३६) ५५३६७ (१८-०१-२०२३). श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.सुनिल केदार (सावनेर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चेक नापुर (सकमुर ) (ता.गोंडपिंपरी, जि.चंद्रपूर) येथील रस्ता रुंदीकरणासाठी संपादित करण्यात आलेल्या जमिनीचा शेतक-यांना मोबदला देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा. सार्वजनिक बांधकाम मंत्री यांना दिनांक १ फेब्रुवारी, २०२१ रोजी निवेदन दिले हे खरे आहे काय,

(२) तसेच मांडवा (ता.कोरपना, जि.चंद्रपूर) येथील टांगळा ते सावलहिरा आणि सावलहिरा ते खडकी रस्त्यांसाठी भुसंपादित केलेल्या जमीनीचा शेतक-यांना अद्याप मिळाला नसल्याने मा. स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा. जिल्हाधिकारी, जि. चंद्रपूर यांना दिनांक ३१ मार्च, २०२२ दिनांक १४ फेब्रुवारी, २०२२ रोजी लेखी निवेदने दिली आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुसार शेतकऱ्यांना संपादीत जमिनींचा मोबदला देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (१५-०५-२०२३) :** (१) आणि (२) होय, हे खरे आहे.
(३) मौ.चेक बापूर (सकमूर) (ता.गोंडपिंपरी, जि.चंद्रपूर) येथील रस्ता रुंदीकरणासाठी संपादित केलेल्या जमिनीचा मोबदला देण्यासाठी रु. २.५० कोटी इतक्या रक्कमेस प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे. त्यानुषंगाने शेतक-यांना द्यावयाच्या मोबदल्याचे दर निश्चित करण्यासाठी प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयाला सादर करण्यात आलेला आहे.

तसेच मांडवा (ता.कोरपना, जि.चंद्रपूर ) येथील टांगाळा ते सावलहिरा आणि सावलहिरा ते खडकी हा रस्ता कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद, चंद्रपूर यांचे कार्यक्षेत्रातील असून संपादित केलेल्या जमिनीचा मोबदला शेतक-यांस मिळण्यासाठी रु. १८.०१ लाख इतक्या रक्कमेचे अंदाजपत्रक जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांना सादर करण्यात आलेले असून पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उदभवत नाही.

---

**राज्यातील महामार्गावरील वाहनधारकांना हायस्पीड बाबत अनधिकृतरित्या दंड आकारण्यात येत असल्याबाबत**

**(३७) ५५५४५ (२२-०१-२०२३). श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील महामार्गावरील वाहनधारकांना हायस्पीड बाबत दुर्बिणद्वारे अनधिकृत दंड आकारण्यात येत असल्याने या महामार्गावर तात्काळ सूचना फलक लावून वेग मर्यादेचे क्षेत्र घोषित करावे व महामार्गावरील वाहनधारकांना आकारला जाणारा अनधिकृत दंड तात्काळ थांबविण्यासंदर्भात मा.जिल्हाधिकारी, जळगांव यांच्याकडे दिनांक २३ मे, २०२२ रोजी वा त्यासुमारास स्थानिक लोकप्रतिनिधींनी लेखी निवेदन दिले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करून कोणता निर्णय घेतला आहे, व त्यांचे स्वरुप काय आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१८-०४-२०२३) :**(१) लोकप्रतिनिधींचे दि.२३.५.२०२२ चे लेखी निवेदन विशेष पोलीस महानिरीक्षक, नाशिक परिक्षेत्र, नाशिक यांच्या दि.१.६.२०२२ च्या पत्राद्वारे भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांचेकडे प्राप्त झाले आहे.
(२) भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण जळगांव यांनी दि.३.६.२०२२ चे पत्राद्वारे कळविल्यानुसार कंत्राटदाराद्वारे महामार्गावर वेगमर्यादा फलक व वेगमर्यादा क्षेत्र असल्याबाबतचे बोर्ड /सूचना फलक लावण्यात आले आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**केज येथील रस्त्यांच्या कामांना वाढीव निधी उपलब्ध करून देण्याबाबत**

**(३८) ५६३५१ (१९-०१-२०२३). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केज विधानसभा मतदार संघातील एकूण ०९ रस्त्यांची दुरवस्था झाली असून या रस्त्यांच्या कामास AMC योजनेअंतर्गत मंजुरी मिळाली असली तरी मंजूर निधीत रस्त्यांचे काम पूर्ण होऊ शकत नसल्यामुळे यासाठी वाढीव निधी उपलब्ध करून देण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, उस्मानाबाद यांचेकडे दिनांक ८ नोव्हेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास केली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने ०९ पैकी किती रस्त्यांना किती वाढीव निधी उपलब्ध करुन देण्यात आला वा येणार आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (२७-०४-२०२३) :** (१) हे खरे आहे.
(२) सदर वाढीव निधीचा प्रस्ताव शासनस्तरावर विचाराधीन आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## केज (जि.बीड) येथील खर्डा-चौसाळा-साळेगाव-माळेगाव-लोखंडीसावरगाव रस्त्याच्या रुंदीकरणाबाबत

**(३९) ५६३५२ (१९-०१-२०२३). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केज (जि.बीड) विधानसभा मतदार संघातील खर्डा-चौसाळा-साळेगाव-माळेगाव- लोखंडीसावरगाव रस्ता राम-६४ कि.मी. ७१/० ते ९८/८०० हा रस्ता अरुंद असून रस्त्याची दुरवस्था झाल्याने वारंवार अपघात होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या रस्त्याचे रुंदीकरण व दुरुस्ती करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी शासनाकडे वारंवार केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदर रस्तांच्या रुंदीकरण व दुरुस्तीसाठी किती निधी मंजूर करण्यात आला वा करण्यात येणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. रविंद्र चव्हाण (२७-०४-२०२३) :** (१) प्रश्नाधीन लांबीतील रस्त्यावरील खड्डे भरुन रस्ता वाहतुकीस सुस्थितीत करण्यात आला आहे.
सन २०२२-२०२३ मध्ये सदर रस्त्यावर वाहनचालकाने भरधाव वेगाने वाहन चालविल्याने ४ अपघात झाल्याची नोंद संबंधीत पोलीस स्टेशनमध्ये आहे.
(२) निवेदने प्राप्त आहे.
(३) सदर रस्त्यावर विविध लेखाशिर्षाअंतर्गत सा.क्र.५८/०० ते ९९/०० या ३२ कि.मी.लांबीमध्ये डांबरीकरण व नुतनीकरण करण्याचे रक्कम रू.३६.७० कोटी च्या मंजूर कामांची निविदा प्रक्रिया पूर्ण करून कामे हाती घेण्याचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## तुमसर (जि.भंडारा) तालुका मुख्यालय येथील इमारत वापराविना बंद असल्याबाबत

**(४०) ५६७९० (२४-०४-२०२३). श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.नितेश राणे (कणकवली), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) तुमसर (जि.भंडारा) तालुका मुख्यालयातील सर्व शासकीय व निमशासकीय कार्यालये एकाच इमारतीत असावी यासाठी प्रशासकीय भवनांना मंजुरी देऊन या प्रशासकीय इमारतीचे बांधकाम दीड वर्षांपूर्वी पूर्ण होऊनही वापराविना बंद असल्याची बाब माहे जानेवारी, २०२३ च्या पहिल्या आठवड्यात वा निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रशासकीय भवनांचा उपयोग प्रशासकीय कार्यालयासाठी अद्याप सुरू न झाल्याने शासनाला उपविभागीय अधिकारी कार्यालय, तालुका कृषी कार्यालय आणि इतर सर्व कार्यालयाच्या भाड्यापोटी दरवर्षी लाखो रुपयाचा खर्च करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, तुमसर तालुक्यातील जनतेला एकाच जागी सर्व सोयीसुविधा उपलब्ध होण्याच्यादृष्टीने सदर मुख्यालयातील प्रशासकीय इमारतीचे उद्घाटन करुन तेथे सर्व कार्यालये सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (१८-०५-२०२३) :** (१) नाही, हे खरे नाही,
तहसिलदार, तुमसर यांनी दि.१७.०३.२०२३ रोजी इमारतीचा ताबा घेतलेला आहे.
(२) अंशत: खरे आहे.
तहसिलदार ,तुमसर यांनी दि.१७.०३.२०२३ रोजी इमारतीचा ताबा घेतलेला असून पुढील आवश्यक ती कार्यवाही प्रगतीत आहे.
(३) पुढील आवश्यक ती कार्यवाही प्रगतीत आहे.
(४) प्रश्नच उद्भवत नाही.

---

## मराठी भाषा भवन इमारतीचे बांधकाम सुरु करण्ाबाबत

**(४१) ५८३११ (२४-०४-२०२३). श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.संजय पोतनीस (कलिना) :** सन्माननीय **मराठी भाषा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई येथील जवाहर बालभवन, चर्नी रोड, भूखंड क्र.१७३६ येथे मराठी भाषा भवन इमारत बांधकामाला शासनाने दिनांक ६ एप्रिल, २०२२ रोजी वा त्या सुमारास प्रशासकीय मान्यता देऊनही माहे जानेवारी, २०२३ च्या दुसऱ्या सप्ताहापर्यंत या इमारतीचे काम सुरु करण्यात आले नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दिनांक २५ जानेवारी, २०२३ रोजी झालेल्या बैठकीत मा.मंत्री महोदयांनी मराठी भाषा भवन व जवाहर बालभवन या दोन्ही इमारतींचा एकत्रित विकास करता येईल याबाबत विचार करुन त्यानुसार आराखडे सुधारीत करण्याबाबत संबंधित वास्तुविशारद व महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांना सूचना दिल्या आहेत हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त सूचनेनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर (१०-०५-२०२३) :** (१) व (२) होय. मराठी भाषा भवन, मुख्य केंद्र, चर्नी मार्ग या इमारतीच्या प्रकल्प खर्चाकरिता शासन निर्णय दि.०६.०४.२०२२ अन्वये रु.१२६.८९ कोटी इतकी प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. मराठी भाषा भवन, मुख्य केंद्र या इमारतीच्या बांधकाम व आराखडे या संदर्भात दि.३०.११.२०२२ व दि.२४.०१.२०२३ रोजी मंत्री स्तरावर आयोजित बैठकीमध्ये मराठी भाषा भवन व शालेय शिक्षण विभागाच्या अधिनस्त कार्यालयाची इमारत या दोन्ही इमारतींचा एकत्रित विकास करता येईल याबाबत विचार करुन त्यानुसार आराखडे सुधारीत करण्याबाबत संबंधित वास्तुविशारद व महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांना सूचना दिल्या आहेत.
(३) गिरगाव महसूल विभागातील भूखंड क्र. १७३६, चर्नी मार्ग, मुंबई या भूखंडावर मराठी भाषा भवन, मुख्य केंद्र व सदर भूखंडाशेजारील शालेय शिक्षण विभागाच्या अधिनस्त कार्यालयांची संयुक्त भव्य इमारत उभारण्याच्या अनुषंगाने संबंधित वास्तूविशारदाने सुधारित आराखड्यांचे सादरीकरण केले. तसेच, दि.१९.०४.२०२३ रोजीच्या मा.मंत्रिमंडळ बैठकीसमोर सदर सुधारित आराखड्यांचे सादरीकरण करण्यात आले असून पुढील आवश्यक कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईतील वांद्रे येथे ४८ हजार चौ.फु.जागेवर १२ मजल्यांचे भव्य शासकीय विश्रामगृह उभारण्याबाबत

**(४२) ५९०६५ (२५-०४-२०२३). डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.शेखर निकम (चिपळूण) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील वांद्रे येथे ४८ हजार चौ.फु.जागेवर १२ मजल्यांचे भव्य शासकीय विश्रामगृह उभारण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रस्तावाचे थोडक्यात स्वरुप काय आहे व त्यानुसार शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (१८-०५-२०२३) :** (१) हे खरे आहे.
वांद्रे शासकीय वसाहतीच्या भूखंडावरील ४४४४ चौ.मी.भूखंडावर नवीन शासकीय विश्रामगृह इमारतीचे बांधकामास शासन निर्णय क्र.जी-२०१९/प्र.क्र.१२२/इमा-३,दि.२२.०८.२०१९ अन्वये रू.१६२ कोटी रक्कमेस प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे.
(२) सदर विश्रामगृहाच्या नियोजनानूसार ३ भूमीगत तळमजले +तळमजला+१ मजला व्यावसायिक वापराकरीता (कार्यालयीन वापराकरीता) +१ सर्विस मजला+११ मजले (रूम कक्ष) +टेरेस इतके बांधकाम प्रस्तावित आहे.सदर प्रकल्पाची निविदा प्रक्रिया पूर्ण झाली असून पुढील आवश्यक कार्यवाही प्रगतीत आहे.
(३) प्रश्नच उद्भवत नाही.

---

**राज्यात तासिका तत्त्वावरील नियुक्तीकरीता नवीन पर्यायी धोरण तयार करणे बाबत**

**(४३) ५९४८८ (२४-०४-२०२३). श्रीमती श्वेता महाले (चिखली), श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.किसन कथोरे (मुरबाड), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), श्री.योगेश सागर (चारकोप), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात तासिका तत्त्वावरील नियुक्तीच्या धोरणाचा आढावा घेऊन नवीन पर्यायी धोरणाबाबत शासनाने संचालक उच्च शिक्षण यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली होती हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर समितीने तासिका तत्त्वावरील अध्यापकांबाबत केलेल्या शिफारशीनुसार दरमहा मिळणाऱ्या मानधनात वाढ आणि इतर सर्व शिफारशींची अंमलबजावणी होण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) पाटील (०९-०५-२०२३) :** (१) हे खरे आहे.
(२) समितीने केलेल्या शिफारशी विचारात घेऊन शासन निर्णय दिनांक १७ ऑक्टोबर, २०२२ अन्वये तासिका तत्वावरील अध्यापकांच्या नियुक्तीकरिता कार्यपध्दती निश्चित करण्यात आली आहे. तसेच, दिनांक २७ मार्च, २०२३ च्या शासन निर्णयान्वये अभ्यागत/तासिका तत्वावरील अध्यापकांना प्रदान करावयाच्या मानधनाचे दर सुधारित करण्यात आले आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नवी दिल्लीतील महाराष्ट्र सदन व गोव्यातील पणजी या ठिकाणी असलेली महाराष्ट्र परिचय केंद्र बंद पडण्याच्या अवस्थेत असल्याबाबत**

**(४४) ५९५८१ (२४-०४-२०२३). श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.धनंजय मुंडे (परळी), श्री.अनिल पाटील (अमळनेर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) :** सन्माननीय **मराठी भाषा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्राची संस्कृती, परंपरा यांचा परिचय व प्रसार देशातून आणि परदेशातून येणाऱ्या पर्यटकांना व्हावा तसेच मराठी भाषेबद्दल माहिती मिळावी यासाठी विविध राज्यांमध्ये महाराष्ट्र परिचय केंद्र सुरु करण्यात आली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नवी दिल्लीतील महाराष्ट्र सदन व गोव्यातील पणजी अशा दोन ठिकाणी ही महाराष्ट्र परिचय केंद्र असून सदर केंद्रामध्ये कर्मचाऱ्यांची भरती केली नसल्याने तेथील सांस्कृतिक कार्यक्रम ठप्प पडल्याचे तसेच पणजी येथे असलेल्या केंद्रातील ‘क’’ गटातील कर्मचाऱ्यांची सिंधुदूर्ग जिल्ह्याच्या माहिती कार्यालयात बदली करण्यात आल्याने सदरील केंद्रही बंद पडल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, परीचय केंद्र सुरु होण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात वा येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर (०८-०५-२०२३) :** (१) महाराष्ट्र परिचय केंद्र सामान्य प्रशासन विभागाच्या माहिती व जनसंपर्क विभागाच्या अखत्यारीत येतात.
सदर विभागाच्या सहकार्याने मराठीचा प्रचार-प्रसार करण्यासाठी योजना/उपक्रम आखता येईल का या संदर्भात दि. १२.१२.२०२२ रोजी बैठक घेण्यात आली होती. सदर बैठकीत झालेल्या निर्णयाप्रमाणे नवी दिल्ली व गोवा येथील महाराष्ट्र परिचय केंद्रामार्फत मराठी प्रचार-प्रसार कार्यक्रमासाठी प्रत्येकी रु. १० लक्ष अनुदान देण्याबाबत योजना/उपक्रम सुरु करण्याची कार्यवाही शासन स्तरावर सुरु आहे.
(२) दि. १२.१२.२०२२ च्या बैठकीत पदे रिक्त असणे जागा भाड्याची असणे असे मुद्दे माहिती व जनसंपर्क विभागाच्या निर्दशनास आणण्यात आले.
सदर बाब माहिती व जनसंपर्क विभागाच्या अखत्यारीत असल्यामुळे, या मुद्याच्या अनुषंगाने आवश्यक कार्यवाही करण्याबाबतचे निर्देश
माहिती व जनसंपर्क विभागाला देण्यात आले आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील खाजगी विद्यापीठांना शुल्क नियामक प्राधिकरणाच्या (एफआरए) नियंत्रणाखाली आणण्याच्या प्रस्तावाबाबत

**(४५) ५९६५० (२४-०४-२०२३). श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील खाजगी विद्यापीठांना शुल्क नियामक प्राधिकरणाच्या (एफआरए) नियंत्रणाखाली आणण्याच्या प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रस्तावावर निर्णय घेऊन याबाबत अंमलबजावणी होण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) पाटील (०८-०५-२०२३) :**(१) अंशत: खरे आहे.
(२) राज्यात स्थापन झालेल्या स्वयं अर्थसहाय्यित विद्यापीठांच्या अधिनियमात शुल्क संरचना पुनर्विलोकन समिती व अनुषंगिक तरतुदी करुन विधेयक विधानमंडळाच्या हिवाळी अधिवेशन, २०२२ मध्ये सादर करण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जव्हार येथील सार्वजनिक बांधकाम विभागाचे (जि. ठाणे) अधिकारी कार्यालयात उपस्थित रहात नसल्याबाबत

**(४६) ५९७०६ (२५-०४-२०२३). श्री.दौलत दरोडा (शहापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जव्हार (जि. ठाणे) येथील सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी श्री.वि.द.सपकाळे हे महिन्यातून केवळ दोन ते तीन वेळाच कार्यालयात उपस्थित रहात असल्याने आदिवासी भागातील रस्त्यांबाबतच्या समस्यांचे निराकारण होत नसल्यामुळे तेथील स्थानिकांनी दिनांक २३ जानेवारी, २०२३ रोजीच्या सुमारास कार्यालयातील कर्मचा-यांना कोंडून ठेवल्याची घटना घडली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने संबधित अधिका-यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (२४-०५-२०२३) :**(१) व (२) सार्वजनिक बांधकाम विभाग, जव्हार (जि.ठाणे) या कार्यालयातील कर्मचाऱ्यांना कोंडून ठेवल्याची घटना घडल्याचे निदर्शनास आलेले नाही. तथापि, सदर अधिकारी वारंवार अनुपस्थित राहत असल्याचे शासनाच्या निदर्शनास आलेले असून त्यांच्यावर कारवाई करण्याची बाब प्रस्तावित आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## ब्रम्हपूरी, सिंदेवाही व सावली (जि.चंद्रपूर) तालुक्यातील रस्त्यांच्या कामांवरील स्थगिती उठविण्याबाबत

**(४७) ६०३५७ (२५-०४-२०२३). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्हयातील ब्रम्हपूरी, सावली व सिंदेवाही तालुक्यातील तसेच नागपूर जिल्हयातील सावनेर व कळमेश्वर तालुक्यात सन २०२१ पासून तसेच जुन, २०२२ पर्यत नवीन रस्त्यांचे बांधकाम करणे, रस्ते दुरस्ती करणे बाबत अनेक कामांना मंजूरी देण्यात आलेली असून सार्वजनिक बांधकाम विभाग चंद्रपूर व नागपूर च्या वतीने उपरोक्त कामांचे प्रस्ताव,अंदाजपत्रक,निविदा तयार करण्याची प्रक्रिया सुरु आहे,हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कामांच्या निविदा प्रक्रीया सुरु असतानाच सदर प्रक्रियांना स्थगिती देण्यात आली असून स्थगिती मुळे सदर कामांच्या प्रगतीवर विपरीत परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रस्तावित करण्यात आलेले रस्ते अत्यंत खराब असून वारंवार होत असलेल्या अपघतामुळे सदर रस्त्यांचे काम करणे अत्यंत आवश्यक आहे हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, कामांची तातडी आणि आवश्यकता लक्षात घेता दिलेली स्थगिती तात्काळ उठवून कामे तात्काळ पुन्हा सुरु करण्याकरीता कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,
(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. रविंद्र चव्हाण (१६-०५-२०२३) :** (१) व (२) हे खरे आहे

चंद्रपूर जिल्हयातील ब्रम्हपूरी,सावली व सिंदेवाही तालुक्यातील डिसेंबर, २०२१ च्या अर्थसंकल्पामध्ये ०४ कामे व मार्च २०२२ च्या अर्थसंकल्पात ०७ कामे अशी एकूण ११ कामे मंजूर होती. त्यामधील ०४ कामावरील स्थगिती उठविण्यात आली असून ०७ कामांवरील स्थगिती अदयापपर्यंत उठविण्यात आलेली नाही.
(३) रस्त्यांच्या दुरुस्तीची कामे AMC अंतर्गत करुन रस्ता वाहतुकीसाठी सुरळीत ठेवली आहेत.
(४) स्थगित केलेल्या उर्वरित कामांचे पुनर्विलोकन करुन यथायोग्य निर्णय घेण्याचे नियोजन आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्याबाबत**

**(४८) ६०५४१ (२५-०४-२०२३). श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.कैलास घाडगे पाटील (उस्मानाबाद), श्री.प्रमोद (राजू) रतन पाटील (कल्याण ग्रामीण) :** सन्माननीय **मराठी भाषा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्रात मराठी भाषा संवर्धन पंधरवडा सुरू असून मात्र मराठीला अभिजात भाषेचा दर्जा देण्याचा प्रश्न अद्यापही प्रलंबित आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्र शासनाने माहे मे, २०१३ मध्ये वा त्या दरम्यान 'मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा' यासाठी केंद्र सरकारला सविस्तर अहवाल पाठवला आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सद्य:स्थितीत ९ वर्षांचा कालावधी उलटून गेला तरी कोणताही निर्णय घेतला नसल्याचे निदर्शनास आले आहे हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळणेबाबत शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर (१०-०५-२०२३) :** (१), (२) व (३) एखाद्या भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्याची कार्यवाही केंद्र शासनाकडून केली जाते. यासाठी केंद्र शासनाने काही निकष विहीत केले आहेत. ज्येष्ठ साहित्यिक प्रा. रंगनाथ पठारे यांच्या अध्यक्षतेखालील समितीने या निकषांच्या आधारे संशोधन आणि अभ्यास करुन मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळण्यासंदर्भात सविस्तर विवेचन व पुराव्यांसह शासनास सादर केलेला मराठी व इंग्रजी भाषेमधील अहवाल अनुक्रमे दि.१२.०७.२०१३ व दि.१६.११.२०१३ च्या पत्रान्वये केंद्र शासनाकडे पाठविला आहे.

(४) सदर प्रस्तावावर लवकरात लवकर कार्यवाही करुन मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्याबाबत सन २०१३ पासून सचिव / प्रधान सचिव, मा.मुख्य सचिव, मा. मंत्री, मा.मुख्यमंत्री यांचे स्तरावरुन केंद्र शासनाकडे सातत्याने पाठपुरावा करण्यात येत आहे.

दि.२७.०२.२०२० रोजी 'मराठी भाषा गौरव दिनाचे' औचित्य साधून, सन २०२० च्या द्वितीय (अर्थसंकल्पीय) अधिवेशनात "मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्याबाबत केंद्र शासनाने तातडीने निर्णय घ्यावा" अशी शिफारस करणारा शासकीय ठराव महाराष्ट्र विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांमध्ये पारित करुन पुढील कार्यवाहीसाठी केंद्र शासनास अग्रेषित करण्यात आला आहे.

अलिकडेच, मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र शासन यांनी मा. पंतप्रधान महोदयांना मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा लवकरात लवकर देण्याबाबत दि.२४.०८.२०२२ रोजीच्या पत्रान्वये विनंती केली आहे. सदर पत्रास अनुसरुन मा.मंत्री, सांस्कृतिक मंत्रालय, भारत सरकार यांनी दि.०३.०२.२०२३ रोजीच्या पत्रान्वये मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्याबाबतचा प्रस्ताव विचाराधीन असल्याचे कळविले आहे.

तसेच मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा लवकरात लवकर देण्यात यावा याकरीता राज्यातील जनतेकडून जन मोहिम राबवून महामहिम राष्ट्रपती महोदयांना १,२०,००० (एक लक्ष वीस हजार) पेक्षा अधिक पत्र पाठविण्यात आली आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रत्नागिरीतील उदयमनगर येथील रुग्णालयाच्या बांधकामाबाबत**

**(४९) ६१८६६ (२५-०४-२०२३). श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरीतील उदयमनगर येथे माता व बालकांच्या उपचारांसाठी १०० खाटांचे महिला रूग्णालय उभारण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कामाचा कार्यारंभ आदेश कधी देण्यात आला व हे काम पूर्ण करण्याची मुदत केव्हापर्यंत होती, आणि सदर काम पूर्ण होवून रूग्णालय सुरू करण्यात आले आहे काय,

(३) तसेच मुदतीत काम पूर्ण झाले नसल्यास संबंधित मक्तेदार व अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (१७-०५-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) अ) महिला रुग्णालय टप्पा-१ या कामाचे दि.४/३/२०१४ रोजी कार्यारंभ आदेश देण्यात आले होते. सदर कामाची मुदत १८ महिने होती. या कामास दि.३१/०७/२०१७ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती व सदर मुदतीत काम पूर्ण करण्यात आले आहे.

ब) महिला रुग्णालय टप्पा-२ या कामाचे दि.२४/०९/२०१८ रोजी कार्यारंभ आदेश देण्यात आले होते. सदर कामाची मुदत २४ महिने होती.

सदर दोन्ही कामे पूर्ण झाली असून या रुग्णालय इमारतीचा वापर जुलै-२०२० पासून समर्पित कोविड रुग्णालय म्हणून सुरु केला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नागपूर येथील कवी कुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालयातील कर्मचाऱ्यांना सेवा शर्ती लागू करण्याबाबत

**(५०) ६२८०४ (२६-०४-२०२३). श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.संजय जगताप (पुरंदर) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील कवी कुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालयातील उर्वरित १७ पदांना सातव्या वेतन आयोगाची सुधारित वेतन संरचना लागू करावी, आश्वासित प्रगती योजना लागू करावी, ५८ महिन्याची थकबाकी देण्यात यावी, आदी मागण्यांसाठी परीक्षा विभागातील सर्व कर्मचाऱ्यांनी दिनांक ०२ फेब्रुवारी, २०२३ रोजी वा त्या सुमारास काम बंद आंदोलन केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,सदर कर्मचाऱ्यांच्या मागण्या पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) पाटील (१९-०५-२०२३) :** (१) हे खरे आहे.

(२) अकृषि विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयातील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्यांसंदर्भात दि.१५.०२.२०२३ रोजी मा. उप मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करण्यात आली होती. त्यानुसार अकृषि विद्यापीठातील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सातव्या वेतन आयोगाची थकबाकी अदा करण्याचा निर्णय मा. मंत्रिमंडळाच्या मान्यतेने निर्गमित करण्यात आला. तसेच उर्वरित पदांना सातवा वेतन आयोग लागू करणे, सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना पूर्ववत लागू करणे यासंदर्भात निर्णय घेण्याची कार्यवाही सुरू आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव – १ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.